रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १७ ◆ अंक २२६
www.ramprahar.com
# राम प्रहर
सोमवार, ३ मार्च २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग
नेरळमधील अनेकांचा भाजपमध्ये प्रवेश/२
कर्जतच्या बटाटेवड्यांची चौथी पिढीही राखतेय चव!/४
विदर्भाच्या संघाने रणजी ट्रॉफि जिंकली!/८

## चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये भारताचा न्यूझीलंडवर शानदार विजय



**दुबई :** भारतीय क्रिकेट संघाने चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये विजयी परंपरा कायम राखत रविवारी (दि. २) न्यूझीलंडला मात दिली. भारताचा हा सलग तिसरा विजय ठरला. चॅम्पियन्स ट्रॉफीच्या शेवटच्या ग्रुप सामन्यात भारतीय संघाने न्यूझीलंडचा ४४ धावांनी पराभव केला. दुबई आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर झालेल्या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना भारताने श्रेयस अय्यरच्या अर्धशतकाच्या (७९) जोरावर नऊ बाद २४९ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात न्यूझीलंडचा संघ ४५.३ षटकात २०५ धावांवर सर्वबाद झाला. भारताकडून मिस्ट्री स्पिनर वरुण चक्रवर्तीने सर्वाधिक पाच विकेट्स घेतल्या. आता भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात ४ मार्च रोजी दुबईत पहिला उपांत्य सामना रंगेल, तर दुसरी सेमी फायनल न्यूझीलंड आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात ५ मार्चला लाहोरमध्ये खेळली जाईल.

# न्यायिक पायाभूत सुविधांना विशेष प्राधान्य

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे महाडमध्ये प्रतिपादन | दिवाणी न्यायाधीश न्यायालयाच्या नूतन इमारतीचे भूमिपूजन

**महाड : प्रतिनिधी**

राज्य सरकारने न्यायिक पायाभूत सुविधांसाठी दरवर्षी सुमारे एक हजार कोटी रुपयांच्या निधीची तरतूद केलेली आहे. त्याचप्रमाणे उच्च न्यायालयाच्या समितीकडून प्राप्त प्रस्तावाची तातडीने पूर्तता करून कामे मार्गी लावली आहेत. न्यायदानाच्या व्यवस्थेत असलेले पायाभूत सुविधांचे महत्त्व लक्षात घेऊन राज्य शासनाने न्यायिक पायाभूत सुविधा निर्माण करण्यास विशेष प्राधान्य दिले आहे. त्यामुळे राज्यात अधिक गतीने न्यायदानास चालना मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी (दि. २) महाड येथे व्यक्त केला.



महाड येथील दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) न्यायालयाच्या नूतन इमारतीचे भूमिपूजन आणि कोनशिला अनावरण समारंभ सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारकात आयोजित सोहळ्यात सीएम बोलत होते.

सोहळ्यास मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे, महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे, रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खारभूमी विकासमंत्री भरत गोगावले, राज्यसभेचे खासदार धैर्यशील पाटील, उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती मकरंद कर्णिक, मिलिंद साठ्ये, ग्राहक तक्रार निवारण आयोग अध्यक्ष सुरेंद्र तावडे, रायगड जिल्हा प्रभारी प्रमुख व सत्र न्यायाधीश डॉ. सृष्टी नीलकंठ, महाड वकील संघाचे अध्यक्ष ॲड. संजय भिसे, महाडचे दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) प्रवीण उन्हाळे आदी उपस्थित होते. **(पान २ वर..)**

### शेवटच्या घटकापर्यंत न्याय देण्यासाठी प्रयत्नशील –न्यायमूर्ती भूषण गवई

सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई म्हणाले की, महाराष्ट्रात न्यायिक पायाभूत सुविधा उच्च दर्जाच्या आहेत. शेवटच्या घटकापर्यंत न्याय पोहचला पाहिजे यासाठी शासन प्रयत्नशील आहे. न्याय हा पक्षकाराच्या दारी पोहचला पाहिजे हे आपले धोरण आहे. यासाठी महाड येथे अतिरिक्त जिल्हा न्यायालयास शासनाने मान्यता द्यावी तसेच नवी मुंबई येथे उभारण्यात येत असलेल्या देशातील पहिल्या ॲडव्होकेट अकादमी ॲण्ड रिसर्च सेंटरला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात यावे व वाढीव निधीची तरतूद करावी.

### राज्य विधीमंडळाचे आजपासून अर्थसंकल्पीय अधिवेशन

## ‘हम साथ साथ है’ नाही; तर ‘हम आपके है कौन?’सारखी मविआमध्ये परिस्थिती!



**मुंबई : प्रतिनिधी**

अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला आयोजित चहापानावर विरोधकांनी बहिष्कार टाकून नऊ पानांचे पत्र दिले आहे. त्यात नऊ जणांची नावे आहेत, पण सद्या फक्त सात जणांच्या आहेत. त्यामुळे विरोधकांची स्थिती ‘हम साथ साथ है’सारखी नाही; तर ‘हम आपके है कौन?’ अशी आहे. त्यामुळे विरोधकांचे काम कसे चालले आहे हे दिसते, असा टोला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी (दि. २) लगावला.

राज्य विधीमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सोमवारपासून सुरू होणार आहे. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला महायुतीच्या सरकारकडून विरोधकांना चहापानाचे आमंत्रण देण्यात आले होते, मात्र विरोधकांनी सरकारच्या चहापानावर बहिष्कार टाकला. यानंतर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांची एकत्रित पत्रकार परिषद झाली. या वेळी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांनी राज्यातील विविध विषयांवर भाष्य केले.

### मुख्यमंत्र्यांचा टोला

विरोधकांची संध्या कमी आहे. तरीही विरोधकांना आम्ही कमी लेखणार नाही. त्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना सकारात्मक उत्तर देण्याचा प्रयत्न करू. हे अधिवेशन चार आठवडे चालेल. ते कुठेही गुंडाळले जाणार नाही. या अधिवेशनात दोन महत्त्वाच्या विषयांवर विशेष चर्चा होणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. १० तारखेला अर्थसंकल्पसादर केला जाईल. संतुलित अर्थसंकल्प आम्ही मांडू. राज्यावर आर्थिक ताण असला तरी त्यातून आर्थिक शिस्त पाळण्याचा आमचा प्रयत्न असेल. त्यातूनच आम्ही समतोल अर्थसंकल्प राज्याला देऊ, असेही त्यांनी सांगितले. **(पान २ वर..)**

# डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जयंतीनिमित्त श्री सदस्यांनी राबविले स्वच्छता अभियान

### धर्माधिकारी प्रतिष्ठानचे समाजकार्य कौतुकास्पद –आमदार प्रशांत ठाकूर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने सुरू असलेल्या समाजकार्यामुळे महाराष्ट्राची शान वाढत आहे, असे गौरवोद्गार आमदार प्रशांत ठाकूर यांनी रविवारी (दि. २) पनवेलमध्ये स्वच्छता अभियानावेळी केले.



ज्येष्ठ निरूपणकार, महाराष्ट्रभूषण डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जयंतीनिमित्त पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी आणि रायगडभूषण डॉ. सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने राज्यात स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. पनवेलमध्येही हे अभियान राबवण्यात आले.

या अभियानात श्री सदस्यांनी फावडे, कुदळ, झाडूच्या सहाय्याने श्रमदान करीत आयटीआय, उपजिल्हा रुग्णालय तसेच खांदा कॉलनी, कामोठे परिसर स्वच्छ केला. पाच हजार ३००हून अधिक श्री सदस्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत अभियान यशस्वी केले. या अभियानाला आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देत डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान आणि श्री सदस्यांच्या कार्याचे कौतुक केले.

### आमदार महेश बालदी यांचा स्वच्छता अभियानात सहभाग

**उरण : वार्ताहर**

महाराष्ट्र भूषण डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जयंतीचे औचित्य साधून पद्मश्री डॉ. अप्पासाहेब धर्माधिकारी आणि रायगडभूषण डॉ. सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानमार्फत रविवारी (दि. २) उरण शहरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या अभियानात आमदार महेश बालदी यांनी सहभाग घेतला.



या वेळी उरण तहसील कार्यालय, पोलीस ठाणे, ग्रामीण रुग्णालय, न्यायालय, आयटीआय तसेच सर्व शासकीय कार्यालये, मैदाने व प्रमुख रस्त्यांच्या ठिकाणी मोहीम राबवून स्वच्छता करण्यात आली. श्री सदस्यांनी हातात झाडू, घमेले व फावडे घेऊन परिसर स्वच्छ केला. सकाळी ८ ते १२ या वेळेमध्ये १७१४ श्री सदस्यांनी एकूण १५.७९० टन ओला कचरा, तर २५.४३४ टन इतका सुका कचरा जमा केला. डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान आणि श्री सदस्यांच्या या अभियानाची आमदार महेश बालदी यांनी प्रशंसा केली.

# केंद्रीय मंत्री रक्षा खडसे यांच्या मुलीशी छेडछाड; एकाला अटक

**जळगाव : प्रतिनिधी**

केंद्रीय मंत्री रक्षा खडसे यांच्या मुलीच्या छेडछाडप्रकरणी अनिकेत भोईला पोलिसांनी अटक केली आहे. खडसेंच्या अल्पवयीन मुलीची आणि तिच्या मैत्रिणींची त्याने छेड काढली होती. त्या प्रकरणी पोलिसांनी कारवाई केली असून इतर आरोपींचा शोध सुरू आहे.

मुक्ताईनगर तालुक्यातील कोथळी गावात महाशिवरात्रीनिमित्त आदिशक्ती मुक्ताबाईची यात्रा भरते. या यात्रेनिमित्त कोथळी विविध कार्यक्रम होत असतात. केंद्रीय मंत्री रक्षा खडसे यांची कन्या या यात्रेत फराळ वाटप करत होती. या वेळी भोई नावाचा तरुण तिचा पाठलाग करत होता. त्यानंतर खडसे यांची कन्या यात्रेमध्ये सायंकाळच्या वेळेस मैत्रिणीबरोबर फिरायला गेली असता भोई नावाच्या तरुणासह काही टवाळखोरांनी तिचा पाठलाग केला. ती ज्या पाळण्यामध्ये बसत होती, त्या पाळण्यामध्येसुद्धा तरुण बसला. त्यानंतर काही व्हिडीओ चित्रित केले. ही बाब सुरक्षा रक्षकाच्या लक्षात येताच त्यांनी त्याला मज्जाव केला, पण टवाळखोरांनी सुरक्षारक्षकाशी झटापट केली.

### आरोपींवर कडक कारवाई करणार : मुख्यमंत्री फडणवीस

**महाड :** केंद्रीय मंत्री रक्षा खडसे यांच्या मुलीशी छेडछाड करणारे एका विशिष्ट पक्षाचे कार्यकर्ते असल्याचा धक्कादायक खुलासा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. या घटनेतील कुणालाही सोडणार नाही, असा संतप्त इशाराही मुख्यमंत्र्यांनी दिला आहे. पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला असून काहींना अटकही झाली आहे. इतरांनाही अटक केली जाईल. त्यांच्यावर अतिशय कडक कारवाई केली जाईल, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

यानंतर टवाळखोर तरुणांना तातडीने अटक करण्याच्या मागणीसाठी रक्षा खडसे आक्रमक झाल्याचे पहायला मिळाले. मुक्ताईनगर पोलिसांनी अनिकेत भोई, पीयूष मोरे, सोम माळी, अनुज पाटील, किरण माळी या पाच जणांच्या विरोधात पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. अनिकेत भोई याला पोलिसांनी अटक केली आहे, तर इतर आरोपींचा पोलीस शोध घेत आहेत.

## कोट्यवधींचे चंदन जप्त

**पिंपरी : प्रतिनिधी**

पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर मालमत्ताविरोधी पथकाने मोठी कारवाई करीत कोट्यवधी रुपयांचे चंदन जप्त केले असून एका मोठ्या तस्करी रॅकेटचा पर्दाफाश करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार बंगळुरूहून पुणेमार्गे मुंबईच्या दिशेने मोठ्या प्रमाणावर चंदनाची तस्करी होत असल्याची माहिती मिळाली होती. या आधारे मालमत्ताविरोधी पथकाने तत्काळ पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर सापळा रचला. या वेळी एका कंटेनरमध्ये लपवून नेले जात असलेले १० ते १५ टन वजनी चंदन जप्त करण्यात आले. या प्रकरणात पोलिसांनी वाहनचालकासह संशयितांना ताब्यात घेतले असून त्यांच्याकडे चौकशी सुरू आहे.

# भारताकडे इंधन उत्पादक, पुरवठादार बनविण्याची क्षमता

### केंद्रीय मंत्री सर्बानंद सोनोवाल यांचे प्रतिपादन

**उरण : प्रतिनिधी**

हरित जहाजांची मागणी वाढल्याने भारतामध्ये ग्रीन मिथेलॉन अमोनिया आणि हायड्रोजन आधारित इंधनाचा प्रमुख उत्पादन आणि पुरवठादार बनण्याची क्षमता असल्याचे प्रतिपादन केंद्रीय जहाज व बंदरेमंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी केले.

एपी मोल्लर-मर्स्क कंपनीने जेएनपीएच्या एपीएम टर्मिनल येथे मिथेलॉनवर चालणाऱ्या जहाजाच्या नामकरण समारंभाचे करण्यात आले होते. शून्य प्रदूषण उत्सर्जन करणाऱ्या या जहाजाचे नाव अल्बर्ट मर्स्क असे ठेवण्यात आले आहे. या समारंभास केंद्रीय मंत्री राज्यमंत्री रक्षा खडसे या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. त्या वेळी ना. सोनोवाल बोलत होते.



भारतातील हरित इंधन उत्पादनावर लक्ष केंद्रित करण्याचा मर्स्कचा निर्णय एक स्वागतार्ह पाऊल, जे शाश्वत सागरी भविष्याकडे आमच्या प्रवासाला गती देईल. या जहाजाचे नाव देणे ही केवळ एक परंपरा नाही, ते विश्वास, सहयोग आणि भविष्यासाठी सामायिक दृष्टीचे प्रतिक आहे, असे केंद्रीय जहाज व बंदरेमंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी सांगितले.

एपीएम टर्मिनलसचे सिईओ किथ स्वेन्डसेन म्हणाले की, एपीएम टर्मिनल्स म्हणून आम्ही कमी उत्सर्जन आणि उत्तम कार्यक्षमतेसह बंदर विकसित करण्यासाठी अधिक गुंतवणूक करण्यास तयार आहोत. त्यामुळे व्यवसाय वाढण्यास आणि भारताला जागतिक बाजारपेठांशी जोडण्यास मदत होईल. **(पान २ वर..)**



# नेरळमधील अनेकांचा भाजपमध्ये प्रवेश



**नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत विधानसभा मतदारसंघातील नेरळ जिल्हा परिषद मतदार संघातील अनेक कार्यकर्त्यांनी भाजप प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत भाजप पक्षात प्रवेश केला. भाजपचे सरचिटणीस मंगेश म्हसकर यांच्या पुढाकाराने हा पक्ष प्रवेश घडवून आणण्यात आला.

यामध्ये राष्ट्रवादीचे सुधाकर घारे यांचे निकटवर्तीय समजले जाणारे नेरळ जिल्हा परिषद वार्डमधील धनाजी गरुड यांचा समावेश आहे. गरुड हे नेरळ ग्रामपंचायतचे माजी सदस्य राहिले आहेत. यानंतर राष्ट्रवादीत असताना नेरळ शहर अध्यक्षपदाची त्यांच्यावर जबाबदारी होती, मात्र विधानसभा निवडणुकीत गरुड यांनी आपल्या पक्षाचा राजीनामा देत सुधाकर घारे यांना साथ दिली होती. त्यामुळे गरुड हे घारे यांच्या जवळचे विश्वासू कार्यकर्ते म्हणून पाहिले जात होते, पण रविवारी त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला.

भारतीय जनता पक्ष महाराष्ट्र प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण, पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, माजी आमदार सुरेश लाड, कर्जत विधानसभा अध्यक्ष किरण ठाकरे यांच्या उपस्थितीत हा पक्ष प्रवेश सोहळा झाला. या वेळी गरुड यांच्यासोबत त्यांचे सहकारी पंडित शिंदे, शरद पाटणकर, देवा गवळी, दिलीप राणे, गोविंद कदम, अरुण मोडक, मुकुंद मसणे, वसंत मिरकुटे तसेच शिवसेना ठाकरे गटातील प्रमोद डांगरे यांनी या वेळी भाजपचे कमळ हाती घेतले आहे.

या पक्षप्रवेश सोहळ्याला भाजप तालुका मंडल अध्यक्ष राजेश भगत, रमेश मुंडे, सुनील गोगटे, मंगेश म्हसकर, माथेरानचे आकाश चौधरी, प्रवीण सपकाळ, नितीन कांदळगावकर, नेरळ अनिल जैन, संभाजी गरुड, संतोष धुळे, शरद लाड, भाजप युवा प्रज्ञेश खेडकर यांच्यासह अनेक भाजप कार्यकर्ते यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी भाजप पक्ष प्रवेश करणारे धनाजी गरुड यांनी आपण अंतर्गत गटबाजीमुळे हा पक्षप्रवेश केल्याचे सांगितले.

# मध्य रेल्वेचे महाकुंभाच्या यशात महत्त्वपूर्ण योगदान

## * ३.८५ लाख भाविकांनी केला प्रवास



**रोहे : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेने महाकुंभ-२०२५ च्या भव्य यशात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. सुव्यवस्थित आणि विस्तृत रेल्वे सेवा नेटवर्कमुळे, जगातील सर्वात मोठ्या धार्मिक महाकुंभ-२०२५ दरम्यान प्रयागराज येथे पवित्र स्नान करण्यासाठी ३.८५ लाखांहून अधिक भाविकांना आरामात प्रवास करता आला आहे.

प्रयागराज येथील महाकुंभमेळ्यात देशभरातील यात्रेकरूंची मोठी गर्दी झाली होती आणि त्यांचा प्रवास सुलभ करण्यात भारतीय रेल्वेने महत्त्वाची भूमिका बजावली. मध्य रेल्वेने या आध्यात्मिक मेळाव्यादरम्यान रेल्वे वाहतुकीचा मोठा भाग उचलला ज्यामुळे भाविकांना प्रयागराज आणि जवळच्या शहरांच्या पवित्र भूमीवर सहज आणि आरामात पोहचण्यास मदत झाली. १७,०००पेक्षा अधिक रेल्वे प्रवाशाना भारतीय रेल्वेने विविध ठिकाणांहून प्रयागराज आणि आसपासच्या भागात पोहचवण्यात आणि परत आणण्यात आणि महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

कुंभमेळयातील भाविकांसाठी मध्य रेल्वेने एकट्या मुंबईहून एकूण ८२३ रेल्वे सेवा चालवल्या, ज्यामध्ये लोकमान्य टिळक टर्मिनस (एलटीटी) येथून ७०८ आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून ११५ रेल्वे सेवांचा समावेश आहे.

पुण्याहुन ६ विशेष गाड्यांसह १०२ रेल्वे सेवा तर नागपूरने ६ विशेष गाड्यांसह २२५ रेल्वे सेवा चालवल्या. या गाड्या काळजीपूर्वक नियोजन करुन चालवल्या गेल्या. मध्य रेल्वेने महाकुंभ-२०२५ साठी भाविकांना विशेष सुविधा पुरवली आणि विविध स्थानकांवर ६७९३ हून अधिक गाड्या थांबल्या. प्रमुख स्थानकांवरून जाणाऱ्या गाड्यांमध्ये भाविकांची गर्दी होती.

# आमदार रविशेठ पाटील यांच्या हस्ते भाल-विठ्ठलवाडी रस्ता कामाचे भूमिपूजन

**पेण : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री ग्राम सडक योजना रायगड टप्पा -२ अंतर्गत पेण तालुक्यातील मुख्य जिल्हा रस्ता ते भाल विठ्ठलवाडी साडेचार किलोमीटर काँक्रिट रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन आमदार रवीशेठ पाटील यांच्या हस्ते आज करण्यात आले.



या कार्यक्रमास माजी जि.प. अध्यक्ष नीलिमा पाटील,माजी जि.प.सदस्य प्रभाकर म्हात्रे, तालुका अध्यक्ष श्रीकांत पाटील, वढाव सरपंच पुजा पाटील, डेप्यूटी खेडेकर, कृषी उत्पन्न समिती सभापती महादू मानकर, व्ही.बी. पाटील, वाशी सरपंच संदेश ठाकूर, प्रफुल म्हात्रे, दिव माजी सरपंच विवेक म्हात्रे, वाशी माजी सरपंच गोरख पाटील, सामाजिक कार्यकर्ते अशोक पाटील, उपसरपंच ओमकार म्हात्रे, वाशी विभाग अध्यक्ष जितेंद्र म्हात्रे, जांभळे उपस्थित होते.

# लोककला आणि नाटकाबाबत अधिक संशोधन करा

## सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. शेलार यांचे आवाहन

**मुंबई : प्रतिनिधी**

मराठी नाटकाची पायाभरणी विष्णुदास भावे यांनी केली यामध्ये काही दुमत नाही. पण त्यापुर्वी लोक कलांमधून नाटक या कलाकृतीचे काही संदर्भ सापडत असून त्याबद्दल लेखन आणि चर्चा सुरु आहेत. त्यामुळे याबाबत एक सर्वंकष अभ्यास आणि संशोधन होण्याची गरज आहे. या कामी अखिल भारतीय नाट्य परिषदेने पुढाकार घ्यावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड् आशिष शेलार यांनी आज येथे केले.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या १०० व्या नाट्य संमेलनानिमित्त मुंबईत आयोजित केलेल्या नाट्य महोत्सवाचा समारोप आज मान्यवरांच्या उपस्थितीत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नाट्यगृह भायखळायेथे संपन्न झाला.



समारोप प्रसंगी नाट्य जागर मधील विजेत्या३विशेष एकांकिकांचे सादरीकरण करण्यात आले. समारोप प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड् आशिष शेलार आणि सचिव विकास खारगे यावेळी उपस्थित होते.

यावेळी ॲड् आशिष शेलार म्हणाले की, नाट्य परिषदेने शंभराव्या नाट्य संमेलनाच्या निमित्ताने विविध भाषांमधील नाटकांचा महोत्सव आयोजित केला हे अत्यंत स्तुत्य उपक्रम असून विविध भाषांमधील विचार, नाटक, काव्य, कथा आणि त्यातील सांस्कृतिक विविधता याचे अदान प्रदान होणे आवश्यक आहे. मराठी भाषा ही नेहमीच अन्य भाषेतील शब्द सामावून घेतच आली आहे तसेच मराठी भाषेतील अनेक शब्द अन्य भाषांनी ही लिलया सामावून घेतले आहेत.

आपले मराठी नाटक हे शंभर वर्षांहून मोठी परंपरा असलेले आहे. विष्णुदास भावे यांनी नाटकाचा रंगमंचावरील पहिला अविष्कार सादर केला यात काही दुमत नाही. पण आता नवनवीन माहिती समोर येत असून लोककलांमध्ये नाटकाची मुळे आहेत असे लेखन समोर येते आहे. त्यामुळे अशा प्रकारचे संशोधन करण्यासाठी एखादा अभ्यास गट नाट्य परिषदेने स्थापन करुन याबाबत संशोधन करावे सरकार या कामी पुर्ण मदत करेल, असे ही आश्वासित केले.

# मध्य रेल्वेतर्फे सांस्कृतिक स्पर्धा

**रोहे : प्रतिनिधी**

चेन्नई येथील इंटिग्रल कोच फॅक्टरी येथे दिनांक २६ आणि २७ फेब्रुवारी रोजी झालेल्या आंतर-रेल्वे सांस्कृतिक स्पर्धा (नृत्य)-२०२५ मध्ये एकूण सर्वोत्तम कामगिरीसाठी मध्य रेल्वेच्या सांस्कृतिक संघाने सरताज ट्रॉफी जिंकून प्रशंसा मिळवली.

आंतर-रेल्वे सांस्कृतिक स्पर्धा (नृत्य)-२०२५ मध्ये शास्त्रीय नृत्य आणि समूह नृत्य या २ श्रेणींमध्ये स्पर्धा होत्या. मध्य रेल्वेच्या रितुपर्णा भौमिकने कथक नृत्याच्या सादरीकरणासाठी १७ सहभागींपैकी शास्त्रीय नृत्य प्रकारात प्रथम क्रमांक पटकावला.

महाराष्ट्र आणि गुजरातच्या सीमेवर वसलेल्या डांग प्रदेशातील लोकनृत्य, डांगी नृत्य या सादरीकरणासाठी समूह नृत्य प्रकारात मध्य रेल्वेच्या संघाने तिसरे पारितोषिक व सरताज ट्रॉफी जिंकली, भारतीय रेल्वेच्या सर्व सहभागी विभाग, कार्यशाळा आणि उत्पादन युनिट्समध्ये सर्वोत्तम कामगिरीसाठी देण्यात आली. मध्य रेल्वेतील एकूण २३ कलाकार, ज्यात नर्तक, नृत्यदिग्दर्शक, साथीदार, मेकअप कलाकार, सहाय्यक यांचा समावेश होता, .

मध्य रेल्वे सांस्कृतिक अकादमी विभागीय स्तरावर स्पर्धा आयोजित करते आणि विजेत्यांना विभागीय स्तरावर मध्य रेल्वेचे प्रतिनिधित्व करण्यासाठी निवडले जाते. मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक श्री धर्म वीर मीना यांनी मध्य रेल्वेच्या संघाचे अभिनंदन केले

# बोरघाटात कारला आग

**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावरील बोरघाटातील ढेकू गावच्या हद्दीत रविवारी (दि. २) सायंकाळी ४.३० वा कारला आग लागली. या घटनेत कोणतीही जीवित हानी झाली नसले तरी कारचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

घटनेची माहिती मिळताच बोरघाट पोलीस व देवदूत टीमने तात्काळ घटनास्थळी धाव घेत फोमचा मारा करून आग विझविण्यात यश मिळवले.



# अलिबाग शहरातील वाहतूक कोंडी दूर करण्याची मागणी

**अलिबाग : प्रतिनिधी**

शहरातील वाढती वाहतूक कोंडीची समस्या अधिक गंभीर बनत चालली आहे. शहरातील ही समस्या लवकर दूर करावी अशी मागणी परशुराम हिंदू सेवा संघाचे जिल्हा अध्यक्ष अभिजीत दातार आणि इतर पदाधिकारी यांनी केली आहे. त्या बाबत प्रशासनाला निवेदन देण्यात आले आहे.

अलिबाग शहर दिवसेंदिवस गर्दीने भरू लागले आहे. शहरात वाहनांची वाढती वर्दळ ,रस्त्यावर कुठे ही उभी केली जाणारी वाहने,अनधिकृत फेरीवाले, यामुळे वाहतूक कोंडी होत आहे. शहरातील बस स्थानका समोर दोन दिवसांपूर्वी घडलेल्या अपघातात एका १७ वर्षाच्या मुलाला आपला प्राण गमवावा लागला.शहरात या पूर्वी देखील असाच जीवघेणा अपघात घडला आहे.

दरम्यान वाढत्या वाहतूक कोंडी आणि घडणाऱ्या अपघातांमुळेपरशुराम हिंदू सेवा संघाने पुढाकार घेऊन शहरातील वाहतुकीची समस्या मार्गी लावावी अशी मागणी केली आहे. अपघात टाळण्यासाठी बस स्थानका समोरील दुभाजकाची लांबी कमी करावी,फेरीवाले आणि छोट्या व्यावसायिकांमुळे अडवला जाणारा पदपथ या समस्येवर उपाययोजना करावी, संबंधितांवर कारवाई करावी, शहरात वाहतूक कोंडी होणार नाही याची दक्षता घ्यावी, अशी मागणी सेवा संघाच्या वतीने करण्यात आली असून जिल्हाधिकारी,नगरपरिषद प्रशासन,आणिपोलिस अधीक्षक यांना निवेदन देण्यात आले

# खोपटे आणि पिरकोन शाळेत विज्ञान दिन

**उरण : बातमीदार**

रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खोपटे व कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय पिरकोन (भाग – शाळा खोपटे) येथे अगस्त्या इंटरनॅशनल फाउंडेशन आणि सोसायटी जनरल यांच्या संयुक्त विद्यमाने विज्ञान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.



या कार्यक्रमात कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सुजाता महेंद्र बल्लाळ आणि रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खोपटेचे मुख्याध्यापक महेंद्र दयाराम गोंधळी यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. तसेच प्रशांत महादेव कोळी, समाधान नामदेव पाटील, स्वाती सतीश शेंगडे आणि मालिनी मोकळ यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

शाळेच्या गुणवत्तापूर्ण उपक्रमांसाठी भारती मनोहर म्हात्रे, शुभांगी वसंत म्हात्रे, जितेश हनुमान भोईर, तसेच शाळा कमिटीच्या अध्यक्षा सारिका नरेश पाटील आणि एसएमसी सदस्य कृष्णा गजानन ठाकूर यांचेही मोलाचे योगदान लाभले. कार्यक्रमाचा मुख्य आकर्षण कोण बनेगा सायन्स चॅम्पियन ही प्रश्नमंजुषा स्पर्धा होती. याशिवाय रांगोळी स्पर्धा आणि वकृत्व स्पर्धा देखील आयोजित करण्यात आल्या.

शाळेच्यावतीने प्रणिता म्हात्रे, सुचिता म्हात्रे आणि विघ्नेश पारकर यांचे स्वागत करण्यात आले. विज्ञानाबद्दल विद्यार्थ्यांमध्ये आवड निर्माण करण्यासाठी हा विज्ञान दिन विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला असून भविष्यातही असे शैक्षणिक उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे शिक्षकांनी सांगितले.

पान १ वरुन

# न्यायिक पायाभूत सुविधांना विशेष प्राधान्य

रायगड जिल्ह्यातील ऐतिहासिक स्थळ असलेले महाड ही स्वराज्य, क्रांती आणि समता भूमी आहे. या ठिकाणी न्यायालय भूमिपूजन कार्यक्रमासाठी उपस्थित राहणे ही सन्मानाची गोष्ट असल्याचे सांगून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा चवदार तळे सत्याग्रह ही कायदेशीर लढाई होती. हा केवळ पाण्याचा सत्याग्रह नव्हता, तर यामुळे देशाची दशा आणि दिशा बदलली. समतेची, माणुसकीची क्रांती घडली. हा देशाच्या सांस्कृतिक परिवर्तनाचा विजय असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

महाड येथील न्यायालय इमारत सुसज्ज, दर्जेदार होण्यासाठी शासनामार्फत सर्वोतोपरी सहकार्य केले जाईल. यासाठी निधीची कमतरता पडणार नाही तसेच इमारतीचे काम विक्रमी वेळेत पूर्ण केले जाईल, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, देशातील तीन नवीन गुन्हेगारी कायद्यांमुळे गुन्हे तपास, न्यायदान, फॉरेंसिक प्रक्रिया अधिक आधुनिक आणि प्रभावी होणार आहे. या नव्या कायद्यांनुसार येत्या काळात आरोपींना वारंवार कोर्टात हजर करण्यासाठी प्रत्यक्ष नेण्याची गरज भासू नये यासाठी सरकारने मोठे पाऊल उचलले आहेत. राज्यातील सर्व न्यायालये इंटरनेटने जोडण्यात येणार असून नोटिफाइड क्यूबिकल्स तयार करण्यात येत आहेत. हे क्यूबिकल्स तुरूंगांशी ऑनलाइन जोडले जातील. यामुळे व्हिडीओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून सुनावणी शक्य होईल. वेळेअभावी आणि साक्षीअभावी खटले प्रलंबित राहणार नाही. न्यायदानाचे काम जलद व गतीने होईल.

नव्या कायद्यांनुसार केस लांबवण्यासाठी वारंवार तारखा मागता येणार नाहीत, अशी तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे खटल्यांचा निकाल लवकर लागेल आणि न्यायदान प्रक्रियेला गती मिळेल, असे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, न्यायालयाच्या माध्यमातून प्रभावी न्यायदानाचे काम सुरू आहे. खटले लवकर निकाली निघावेत किंवा खटले होऊच नये याकडे लक्ष द्यावे लागेल.

महाराष्ट्रात आंतरराष्ट्रीय दर्जाचे मुंबई, नागपूर, छत्रपती संभाजी नगर येथे लॉ स्कूल उभारण्यात येणार आहेत. या माध्यमातून चांगले विधीज्ञ तयार होतील, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

ऐतिहासिक ठरलेल्या खटल्यामध्ये स्वतः डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महाड न्यायालयात येऊन सत्याग्रहींची बाजू मांडली होती, असे सांगून या संदर्भातील संपूर्ण घटनाक्रम सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई यांनी आपल्या भाषणात सांगितला.

या वेळी बोलताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, सर्वसामान्य माणसाला जलदगतीने न्याय देण्यासाठी राज्य शासन सर्वतोपरी प्रयत्नशील आहे. राज्यात ३२ न्यायालये बांधली गेली असून त्या माध्यमातून न्यायासंदर्भात तातडीने कामकाज होत आहेत. गेल्या तीन वर्षात राज्यात ३२ न्यायालय इमारतींचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे तसेच रिक्त पदे भरती, डिजिटायझेशन करण्यात आले आहे. यामुळे न्यायव्यवस्थेला गती मिळाली आहे. सध्याच्या युगामध्ये आवश्यक असणाऱ्या तंत्रज्ञान आर्टिफिशियल इंटेलिजन्स ही काळाची गरज असून शेवटच्या घटकाला यामुळे अधिक गतीने न्याय मिळेल. पुढे बोलताना महाड न्यायालयाचे काम लवकरात लवकर पूर्ण होईल तसेच या इमारतीच्या माध्यमातून न्यायदानाचे काम जलदगतीने होईल, असा विश्वासही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केला.महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले की, आजचा दिवस अतिशय आनंदाचा दिवस आहे. २००८पासून या इमारतीसाठी प्रयत्न सुरू होते. या इमारतीच्या माध्यमातून जनतेला न्यायाची सुविधा मिळेल. न्यायाचे विकेंद्रीकरण या निमित्ताने होईल. ३३ कोटींचा निधी या इमारतीसाठी मंजूर झाला असून पुरेसा निधी राज्य शासनाने उपलब्ध करून द्यावा, असेही त्या म्हणाल्या. त्याचप्रमाणे महाडमध्ये दक्षिण रायगडसाठी एसडीआरएफ एनडीआरएफचा कायमस्वरूपी बेस कॅम्प तयार होण्याबाबत निर्णय व्हावा, अशी मागणी त्यांनी या वेळी केली.

रोहयोमंत्री भरत गोगावले यांनी महाड येथील दिवाणी न्यायधीश, कनिष्ठ स्तर, न्यायालय नूतन इमारतीच्या संरक्षक भिंत तसेच प्रशाकीय भवन इमारत कामास मंजुरी मिळावी, अशी मागणी केली.

मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे, न्यायमूर्ती मकरंद कर्णिक, मिलिंद साठ्ये, रायगड जिल्हा प्रभारी प्रमुख व सत्र न्यायाधीश डॉ. सृष्टी नीलकंठ यांचीही समायोचित भाषणे झाली. महाड वकील संघाचे अध्यक्ष ॲड. संजय भिसे यांनी कार्यक्रमाचे प्रस्ताविक केले. या वेळी निवृत्त न्यायमूर्ती यशवंत चावरे लिखित महाडचा मुक्तिसंग्राम या पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. महाडचे दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) प्रवीण उन्हाळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

कार्यक्रमापूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी चवदार तळे येथे भेट देऊन भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या वेळी महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे, रोहयोमंत्री भरत गोगावले, विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, पोलीस महानिरीक्षक संजय दराडे, जिल्हाधिकारी किशन जावळे, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

## ‘हम साथ साथ है’ नाही; तर ‘हम आपके है कौन?’सारखी मविआमध्ये परिस्थिती!

या वेळी उपमुख्यमंत्री शिंदे यांनी विरोधकांवर टीका केली. ते म्हणाले, महायुतीच्या सरकारचे हे दुसरे अधिवेशन आणि निवडणुकीनंतर आता सरकारचा पहिला अर्थसंकल्प सादर होणार आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार अर्थसंकल्प मांडतील, पण विरोधकांचे काय? त्यांचे आमदार कमी आहेत, पण पत्र जास्त आले आहे. विरोधकांचा विरोधी पक्षनेता होऊ शकत नाही एवढे काम जनतेने करून ठेवले आहे. आम्हाला पुन्हा जनतेने बहुमत दिले असले तरी आम्ही हुरळून जाणार नाही. आम्ही चांगले काम करणार आहोत. आरोपांना आम्ही कामाने उत्तर दिलेले आहे आणि यापुढेही कामानेच उत्तर देणार आहोत.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले की, राज्य विधीमंडळाचे हे अर्थसंकल्पीय अधिवेशन चार आठवडे चालणार आहे. अधिवेशनात विरोधकांच्या प्रत्येक प्रश्नाला उत्तर देण्याची आमची तयारी आहे. महायुतीचे सरकार चांगले चालावे यासाठी आमचा सर्वांचा प्रयत्न आहे.

# भारताकडे इंधन उत्पादक, पुरवठादार बनविण्याची क्षमता

एपी मोल्लर-मर्स्कचे सिईओ व्हिनसेन्ट क्लर्क यांनी, भारत जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या प्रमुख अर्थ व्यवस्थांपैकी एक आहे आणि भारतासोबत विविध पैलूंवर भागीदारी करण्यास उत्सुक आहोत. कमी उत्सर्जनाच्या शिपिंगसाठी पर्यायी इंधनाचा संभाव्य स्रोत शोधणे आणि भविष्यात जहाज दुरुस्ती आणि जहाज बांधणीचा समावेश असलेले उपक्रम, जे भारतात सरकारच्या महत्त्वाकांक्षेशी सुसंगत असतील त्याद्वारे सीपिंग क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी मर्स्क त्याच्या ताफ्यात आणखी एक दुहेरी इंधन जहाज जोडून डिकार्बोनाईजीन शिपिंगच्या दिशेने ठोस पावले उचलत असल्याचा दावाही त्यांनी केला.

## निवडक

### मोबाईल खेचून चोरटा पसार

**पनवेल :** मोटरसायकलवर आलेल्या चोरट्याने रस्त्याने मोबाईलवर बोलत जाणाऱ्या पादचाऱ्याच्या हातातील मोबाईल खेचून पसार झाल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. कामोठे सेक्टर-९ परिसरात राहणारे योगेश आहेर हे रात्री सव्वा दहाच्या सुमारास मेडिकलमधून औषध आणण्यासाठी गेले होते. दरम्यान ते मोबाईल फोनवर बोलत जात असताना मोटरसायकलवरून आलेल्या अज्ञात चोरट्याने त्यांच्या हातातील मोबाईल खेचून पलायन केले. त्या प्रकरणी योगेश यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंद करून चोरट्याचा शोध सुरू केला आहे.

### दोन बांगलादेशींवर कारवाई

**पनवेल :** शहर पोलिसांनी दोन बांगलादेशी नागरिकांवर कारवाई करत त्यांना अटक केली आहे. करंजाडे, सेक्टर ६ या परिसरामध्ये काही बांगलादेशी नागरिक वास्तव्य करत असल्याची माहिती पनवेल पोलिसांना मिळाली. त्या ठिकाणी पोलीस गेले असता मोकळ्या मैदानामध्ये एका झोपडीमध्ये दोन पुरुष दिसून आले. त्यांनी त्यांची नावे मोहम्मद राकिब अब्दुल रजाक आणि तरीकुल हरीस उदिन अशी सांगितली. त्यांच्याकडे कोणतीही वैध प्रवासी कागदपत्रे सापडून आली नाहीत.

### स्कूटीच्या धडकेत वृद्ध जखमी

**पनवेल :** खारघर शहरात सेक्टर १२ साई मंदिराजवळील केंद्रीय विहार मेट्रो स्टेशन स्टेशनच्या रस्त्या लगत जाणाऱ्या हरेश रामचंदानी (वय ५८) यांना स्कूटी चालक महिलेने धडक दिली. या प्रकरणी कीर्ती मेहरा हिच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेत रामचंदानी यांच्या उजव्या हाताच्या मनगटात फॅक्चर झाला. मेहरा यांच्या विरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. खारघर शहरात काही दिवसापूर्वी उत्सव चौकात दुचाकी ओव्हरटेक करताना किरकोळ कारणामुळे झालेल्या वादात एकाच मृत्यू झाला होता.

### पत्रकार मयूर तांबडे अध्यक्षपदी



**पनवेल :** पनवेल-नवी मुंबई प्रिंट, डिजिटल पत्रकार संघटनेच्या अध्यक्षपदी पुन्हा एकदा मयूर तांबडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सलग दुसऱ्या वर्षी त्यांची अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली. लालचंद यादव यांच्या कार्यालयात झालेल्या बैठकीत पुन्हा एकदा अध्यक्ष म्हणून मयूर तांबडे यांची नियुक्ती करण्यात आली तर उपाध्यक्ष म्हणून दीपक कांबळे, सचिव म्हणून लालचंद यादव तर खजिनदार म्हणून मिलिंद खारपाटील यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. या वेळी सल्लागार रमेश भोळे, अनिल कुरघोडे, अण्णासाहेब आहेर उपस्थित होते.

### उन्हामुळे कलिंगडाला मागणी

**पनवेल :** मार्च महिना सुरू झाल्याने दुपारी कडक ऊन जाणवू लागले आहे. त्यामुळे रसदार फळांना मागणी वाढू लागली आहे. घाऊक फळ बाजारात सध्या कलिंगड ठीक -ठिकाणी विकले जातात. बाजारात कलिंगडाची आवक वाढली आहे. रमाजानलाही सुरुवात झाल्याने काळात कलिंगडास खूप मागणी असते. किरकोळ बाजारात कलिंगड ३० रुपये किलो दराने मिळत आहेत. मध्यम आकाराचे कलिंगड १०० रुपये तर मोठे कलिंगड १९० रुपये प्रतिनग याप्रमाणे मिळत आहे.

# पनवेल-कर्जत रेल्वेचे काम प्रगतिपथावर

**चौक : प्रतिनिधी**

कर्जत, चौक परिसरातील रेल्वे प्रवासी यांची पनवेल कर्जत रेल्वेचे स्वप्न लवकरच पूर्ण होईल, अशी आशा दिसत आहे. पनवेल-कर्जत लोकल कॉरिडॉरचे काम प्रगतीपथावर आहे. दरम्यान, या लोकलमुळे येथील नागरिकांना होणारे फायदे व तोटे याबाबत विचारविनिमय करणे गरजेचे असल्याचे येथील नागरिकांचे म्हणणे आहे. सर्वात लांब बोगदे, नवीन स्टेशन यांच्यासह पनवेल-कर्जत लोकल लवकरच सुरू होणार आहे.



पनवेल ते कर्जत हे रेल्वे ट्रॅकचे अंतर २९.५ किमी आहे.२९.५ किमी. लांबीचा नवीन लोकल ट्रेन कॉरिडॉर लवकरच कार्यान्वित होणार आहे, असे दिसू लागले आहे. मुंबई उपनगरीय रेल्वेसाठी गेम चेंजर म्हणून याचे वर्णन केले जात आहे.

ही मार्गिका पनवेल ते कर्जतदरम्यानच धावणार असल्याने मुंबई सीएसएमटी, ठाणे किंवा दादरला जाणाऱ्या प्रवाशांना पनवेल किंवा कर्जतला जाणाऱ्या गाड्या बदलाव्या लागणार आहेत. पनवेल-कर्जत हा मार्ग अजून कमी लोकवस्तीचा आहे. चौक परिसरातील काही भागाचे शहरी करण सुरू आहे, तर चौक ते खोपोली मार्गावर वावंढळ येथे नवीन इमारतींच्या बांधकामांचा शुभारंभ सुरू आहे. पनवेल-कर्जत मार्गावरून सरळ ठाणे आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस असा गाडी न बदलता सरळ मार्ग झाल्यास प्रवाशी वर्गाला कमी वेळेत सुखकर प्रवास मिळेल. यासाठी रेल्वे ट्रॅक वाढविणे गरजेचे आहे. कर्जत मार्गे जाणाऱ्या अतिजलद गाड्या याही या मार्गावरून काढता येतील. यासाठी पनवेल, चौक ते खोपोली आणि चौक ते कर्जत या मार्गावर निवासी विकास प्रकल्प होणे गरजेचे आहे.

या प्रकल्पात तीन बोगदे आहे. सर्वांत लांब वावरले बोगदा २६२५ मीटर आहे. दोन रेल्वे उड्डाणपूल, ४४ पूल आणि सात रोड ओव्हरब्रिज आहेत. येथे ट्रॅक वाढविणे गरजेचे असून, पासिंगसाठी ट्रॅक असणे आवश्यक आहे. हा मार्ग सुरक्षित आणि यशस्वी करण्यासाठी असणाऱ्या सुविधा यांच्या बरोबर शहरीकरण आणि औद्योगीक विकास, माथेरान, कर्जत तालुक्यातील पर्यटन भाग विकसित होणे अपेक्षित आहे.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात आजी माजी विद्यार्थ्यांमध्ये संवाद

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात माजी विद्यार्थी संघटनेच्या वतीने शनिवारी (दि.१) सकाळी ११ वाजता एसवायबीएससी आयटी व टीवाय बीएससी आयटीच्या विद्यार्थ्यांसाठी करिअर संधींवरील विशेष माजी विद्यार्थी संवादाचे आयोजन केले होते.



या संवादासाठी महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी रवींद्र कुमार आणि सय्यद झैद यांनी आजी विद्यार्थ्यांसोबत वेगवेगळ्या त्यांचे अनुभव कथन केले तसेच वेगवेगळ्या क्षेत्रात असणाऱ्या नोकरीच्या संधी करिअरच्या दृष्टिकोनातून किती महत्त्वाच्या आहेत याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले. महाविद्यालयातील सुमारे ४० विद्यार्थी उत्साहाने सहभाग घेतला व त्यांच्या वेगवेगळ्या शंका उपस्थित करून शंकांचे निरसन करून घेतले.

या संवादामुळे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी हा अनुभव अत्यंत प्रेरणादायी असल्याचे सांगितले आणि भविष्यासाठी उपयुक्त माहिती मिळाल्याबद्दल समाधान व्यक्त केले. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी आजी व माजी विद्यार्थ्यांशी संवाद साधला तसेच त्यांना मार्गदर्शन केले.

या वेळी प्रा. प्रवर शर्मा, प्रा. रेवन शिंदे, प्रा. राहुल कांबळे, प्रा. राजश्री म्हात्रे, प्रा. हलिमा सादिया आणि प्रा. रुपाली नागरेकर यांनी या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले.





**पनवेल : वहाळ ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच तथा भाजप उलवे नोड विभागीय अध्यक्ष अमर म्हात्रे यांना वाढदिवसानिमित्त आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी पदाधिकारी, कार्यकर्ते आदी उपस्थित होते.**

## पदपथावर लावलेल्या जाहिरात फलकावर कारवाईची मागणी

**विकास घरत यांचे पमपा आयुक्तांना निवेदन**

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कामोठे वसाहतीमध्ये चौकाचौकात अनियंत्रित पद्धतीने लावलेल्या जाहिरात फलकावर कारवाई करून जाहिरात फलक निष्कासित करावे तसेच, स्थानिक रहिवाशी तसेच चाकरमान्यांच्या सुरक्षेचा पालिकेने विचार करावा, अशी मागणी भाजपचे माजी नगरसेवक विकास घरत यांनी केली आहे. याबाबतचे लेखी निवेदन घरत यांनी आयुक्त मंगेश चितळे यांना दिले आहे.

जाहिरात फलके लावण्याचा ठेका देणाऱ्या ठेकेदारांनी कामोठे वसाहतीमधील मिळेल त्या मोकळ्या जागेत ठेकेदाराने जाहिरात फलक उभे केले आहेत. या जाहिरातीच्या फलकामुळे कामोठेकराचा जीव धोक्यात आला आहे. ठेकदाराने लावलेले हे फलक पदपथावर लावण्यात आले आहेत. पदपथाचा दर्शनीय भाग तोडून त्यावर ही फलक उभे केले आहे. पदपाथ हा चाकरमान्यासाठी चालण्यासाठी



असतो, तसेच पदपथावर नेहमी गर्दी असते, त्यामुळे जर एखादी दुर्घटना घडली तर मोठी जीवितहानी होऊ शकते असे माजी नगरसेवक विकास घरत यांनी आयुक्तांच्या निदर्शनास आणून दिले आहे. पदपथासोबत मुख्य रस्त्याच्या मध्यभागी असलेल्या डीवाईडरवर देखील भलेमोठे जाहिरात फलक लावले आहेत आणि या फलकाचा काही ९० टक्के भाग मुख्य रस्त्याच्या दोन्ही बाजूला येतो.

या मुख्य मार्गावरून दिवस रात्र वाहनाची वर्दळ मोठी असते. अश्या फलकावर कारवाई करून नागरिकांचा धोक्यात आलेला जीव वाचवावा, अशी मागणी माजी नगरसेवक घरत यांनी केली आहे. तसेच सदर ठेकेदाराने अनेक नियमांना तिलांजली दिली आहे असा आरोप घरत यांनी केला आहे.

त्यामुळे अश्या फलकाची चौकशी करून कारवाई करावी, अशी मागणी माजी नगरसेवक विकास घरत यांनी केली आहे.

## फेसबुकवर मैत्री करून विवाहितेवर अत्याचार

**पनवेल : वार्ताहर**

धुळे येथे राहणाऱ्या एका ३० वर्षीय तरुणाने कल्याणमध्ये राहणाऱ्या एका ३८ वर्षीय विवाहितेसोबत फेसबुकवरून मैत्री करून विवाहितेचे व्हिडिओ तिच्या पतीला व मुलांना दाखवण्याची धमकी देऊन विवाहितेवर लैंगिक अत्याचार केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. विशेष म्हणजे, आरोपीने या विवाहितेकडून दीड लाख रुपयांची रक्कमसुद्धा उकळल्याचे उघडकीस आले आहे. सय्यद आवेज सय्यद आरीफ (वय ३०) असे या आरोपी तरुणाचे नाव आहे. पनवेल शहर पोलिसांनी त्याच्या विरोधात गुन्हा दाखल लिनित्याचा शोध सुरू केला आहे.

या प्रकरणातील ३८ वर्षीय पीडित विवाहितारणा आपल्या कुटुंबासह कल्याण येथे राहते. तर आरोपी सय्यद काव्थळे येथे राहण्यार आहे. २०२२ मध्ये आरोपी सय्यद आवेजने पीडित महिलेसोबत फेसबुकवरून मैत्री केली होती. त्यानंतर त्याने फेसबुकद्वारे पीडित विवाहितेला मॅसेज करून तिचा मोबाइल नंबर मिळवला होता. त्यानंतर आरोपीने पीडित विवाहितेसोबत बोलण्यातून विश्वास संपादन करून तिला व्हीडीओ कॉल करून तो व्हिडीओ कॉल मोबाइल फोनवर रेकॉर्ड केला होता.

हा व्हिडीओ पती व मुलांना पाठवण्याची धमकी देऊन तिला ब्लॅकमेल करण्यास सुरुवात केली होती. त्यानंतर सय्यदने विवाहितेवर पनवेल येथील लॉजवर अत्याचार केले होते. त्यानंतरही आरोपीने अनेकदा पीडितेवर अनेकवेळा अत्याचार केले. तिच्याकडून दीड लाख रुपयेही उकळले. त्यानंतरही आरोपीचे ब्लॅकमेल करणे सुरूच होते. अखेर पीडितेने पनवेल शहर पोलीस ठाण्यात सय्यदविरोधात तक्रार दाखल केली.

## श्री समर्थ बैठक कोन समितीतर्फे स्वच्छता अभियान

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

महाराष्ट्र भूषण डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जयंतीचे औचित्य साधून पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी व डॉ. सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली श्री समर्थ बैठक कोन समितीच्यावतीने पनवेल शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत रविवारी (दि.२) महास्वच्छता अभियान राबविण्यात आले.



या स्वच्छता अभियानात कोन समिती विभाग अंतर्गत मोहोपाडा, शिवनगर, भोकरपाडा, भाताण, कोनसह वीस श्री समर्थ बैठकीतील सदस्यांचा समावेश होता. या वेळी स्वच्छता मोहिमेत जवळपास ३३०० सदस्यांनी भाग घेतला होता. या वेळी सदस्यांच्या हातात झाडू, विला, फावडा आदी उपकरणे दिसून आली तसेच हातात हात मोजे, मास्क घालून शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा १२ एकराचा परिसर स्वच्छ केला. यावेळी साचलेला पालापाचोळा, टाकाऊ कचरा, प्लास्टीक एकत्रित करुन पनवेल महानगरपालिकेच्या वाहनांतून योग्य विल्हेवाट लावण्यासाठी पाठविण्यात आला. यानंतर स्वच्छता मोहिमेची सांगता झाली.

## सिमेंट बल्कर उलटून चालक जखमी

**पनवेल : वार्ताहर**

टी पॉईंट कडून कळंबोलीच्या दिशेने जाणाऱ्या सिमेंट बल्करचा अपघात झाल्याची घटना घडली आहे. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र यात चालक जखमी झाला.

पनवेल परिसरात अनेक विकास कामे तसेच इमारतींची कामे सुरू आहेत. त्यामुळे अपघातांची संख्या देखील वाढली आहे. टी पॉईंटरकडून (एमएच ४३ बीएक्स ६३१६) या क्रमांकाचा सिमेंट बल्कर कळंबोलीच्या दिशेने जात होता. या वेळी उड्डाण पुलावरून जात असताना चालकाचा बल्करवरील ताबा सुटला आणि तो रस्त्याच्या पलीकडे पलटी झाला. या वेळी यात असलेला सिमेंटचा माल त्याच ठिकाणी उलटला.

या अपघातात बल्करवरील चालक थोड्याफार प्रमाणात जखमी झाला. त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले. या अपघाताची माहिती पोलिसांना दिल्यानंतर पोलीस त्या ठिकाणी दाखल झाले होते. सुदैवाने कोणतीही जीवित हानी झाली नाही. या सिमेंट बल्करला बाहेर काढण्याचे काम सुरू होते.

## वीर वाजेकर महाविद्यालयात आपत्ती व्यवस्थापन प्रात्यक्षिके

**उरण : वार्ताहर**

जागतिक नागरी संरक्षण दिनानिमित्त रयत शिक्षण संस्थेच्या उरणमधील वीर वाजेकर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात नागरी संरक्षण दलाच्या वतीने आपत्ती व्यवस्थापनासंदर्भातील विशेष प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले. या प्रात्यक्षिकांमधून विद्यार्थी आणि उपस्थितांना आपत्कालीन परिस्थिती हाताळण्याचे कौशल्य तसेच आवश्यक उपाययोजनांबाबत माहिती मिळाली.



या कार्यक्रमात नागरी संरक्षण दलाच्या प्रशिक्षित अधिकाऱ्यांनी आणि स्वयंसेवकांनी आपत्तीवेळी नागरिकांचे रक्षण कसे करावे, तात्काळ मदतकार्य कसे करावे, तसेच बचाव कार्याचे विविध उपाय कसे अवलंबावे, याबाबत सखोल मार्गदर्शन केले. यावेळी आपत्कालीन सूचना देण्यासाठी भोंगा (सायरन) वाजवण्याचे प्रात्यक्षिक करण्यात आले. जखमी व्यक्तींची स्ट्रेचरच्या मदतीने वाहतूक कशी करावी, याचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. तिसऱ्या मजल्यावरून दोरीच्या सहाय्याने सुरक्षितपणे उतरण्यासाठी (रॅपलिंग) प्रशिक्षण देण्यात आले. याशिवाय झोपडीला लागलेली आग विझवण्यासाठी सिडको फायर ब्रिगेडच्या सहाय्याने प्रत्यक्ष प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. इमारतीत अडकलेल्या रुग्णांना 'केअर नॉट' आणि 'खुर्ची गाठ'च्या साहाय्याने खाली उतरविण्याची प्रक्रिया दाखवण्यात आली.

महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य व नागरी संरक्षण दलाचे माजी जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. आमोद ठक्कर यांनी उपस्थितांचे स्वागत केले. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी नागरी संरक्षण दलाचे सहाय्यक उपनियंत्रक शशिकांत शिरसाठ, मुख्य क्षेत्ररक्षक नवीन राजपाल, उपमुख्य क्षेत्ररक्षक दत्ताराम गोंधळी, विभागीय क्षेत्ररक्षक हरेश्वर ठाकूर (भारत सरकारकडून कांस्यपदक प्राप्त) यांनी विशेष योगदान दिले.

यांच्यासह नितेश घरत, मिथुन म्हात्रे, समीर थली, ज्ञानेश्वर पाटील यांनीही मार्गदर्शन केले. तसेच अनेक स्वयंसेवकांनी या उपक्रमात सहभाग घेतला.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी वीर वाजेकर महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकवर्ग, तु. ह. वाजेकर विद्यालयाचे प्राचार्य एम. जी. म्हात्रे आणि उपप्राचार्य श्री. खुंटे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

या प्रात्यक्षिकांमध्ये वीर वाजेकर महाविद्यालयातील प्रशिक्षित विद्यार्थी, माजी विद्यार्थी, नागरी संरक्षण दलाचे स्वयंसेवक व स्वयंसेविका मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. तसेच तुकाराम हरी वाजेकर विद्यालयाचे विद्यार्थीही यामध्ये सहभागी झाले. १०८ क्रमांकावर फोन करून रुग्णवाहिका मागविण्यात आली होती तसेच १०२ क्रमांकावर फोन करून अग्निशमन दलाची गाडी बोलावण्यात आली. नागरी संर्षण दलाच्या रुग्णवाहिकेचा सहभागसुद्धा या प्रात्यक्षिकात होता.

कार्यक्रमाच्या शेवटी प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर यांनी नागरी संरक्षण दलाच्या संकल्पनेचे महत्त्व पटवून देत, विद्यार्थ्यांनी या क्षेत्रात अधिक योगदान द्यावे, असे आवाहन केले. तसेच त्यांनी सर्व स्वयंसेवक, प्रशिक्षक आणि सहभागी विद्यार्थ्यांचे आभार मानत अशा प्रकारच्या कार्यक्रमांचे आयोजन भविष्यातही करण्यात येईल, असे सांगितले.

## संपादकीय

# अधिवेशनासाठी सरकार सज्ज

राज्य विधीमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सोमवारपासून राजधानी मुंबईत सुरू होत आहे. एकीकडे उन्हाचा पारा चढत असताना या अधिवेशनात विरोधक विविध मुद्द्यांवरून महायुती सरकारला घेरण्याची तयारी करीत आहेत. असे असले तरी मजबूत महायुती सरकार अधिवेशनासाठी पूर्णपणे सज्ज आहे.

**गेल्या वर्षी विधानसभा निवडणुकीनंतर दणदणीत बहुमतासह सत्तेत आलेल्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारचा पहिला अर्थसंकल्प या अधिवेशनात मांडला जाणार आहे. ३ ते २६ मार्च या कालावधीत अधिवेशन होणार असून राज्याचा अर्थसंकल्प १० मार्च रोजी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात मांडण्यात येईल. राज्याच्या सर्वांगीण विकासाला चालना देत राज्याची अर्थव्यवस्था एक ट्रिलियन डॉलरपर्यंत नेण्याचे लक्ष्य मुख्यमंत्री फडणवीस यांनी ठेवले आहे. त्याचे प्रतिबिंब या अर्थसंकल्पातून दिसणार आहे. एकीकडे राज्याला प्रगतीकडे नेत असताना कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठीही मुख्यमंत्री तथा गृहमंत्री फडणवीस दक्ष आहेत. राज्यात मागील काळात ज्या काही घटना घडल्या त्यांचा उचित तपास पोलीस यंत्रणेकडून सुरू आहे. बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण आता न्यायालयात गेले आहे. या प्रकरणात वाल्मिक कराड हाच याचा मुख्य सूत्रधार असून त्याच्यासह विष्णू चाटे, सुदर्शन घुले, प्रतिक घुले, जयराम चाटे, सुधीर सांगळे, सिद्धार्थ सोनवणे व कृष्णा आंधळे यांचा आरोपी म्हणून समवेश आहे. यातील आंधळे हा आरोपी फरार असून बाकी सर्व अटकेत आहेत. या संदर्भात माहिती देताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी संतोष देशमुख हत्येप्रकरणी पोलीस सुरुवातीपासून योग्य तपास करीत आहेत. संपूर्ण पुराव्यानिशी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे. विशेष सरकारी वकील म्हणून उज्वल निकम यांना नेमले आहे. त्यामुळे आरोपींना कठोरात कठोर शिक्षा मिळावी, असा प्रयत्न राहणार असल्याचे ठाणे येथे पत्रकारांशी बोलताना स्पष्ट केले. पुण्यातील स्वारगेट बलात्कार प्रकरणातील आरोपी दत्ता गाडे याच्याही मुसक्या पोलिसांनी आवळल्या असून तोही सध्या कोठडीत आहे. या घटना चर्चेत असताना केंद्रीय मंत्री रक्षा खडसे यांच्या मुलीची गुंडांनी छेड काढल्याचा प्रकार समोर आला आहे. यावर बोलताना मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून काहींना अटकही झाली आहे. इतरांनाही अटक केली जाईल. सार्वजनिक ठिकाणी अशा प्रकारे त्रास देणे, छेडछाड करणे हे अत्यंत चुकीचे आहे. कुठल्याही परिस्थितीत अशा लोकांना माफी देता कामा नये. त्यांच्यावर अतिशय कडक कारवाई केली जाईल, असा इशारा दिला आहे. एकूणच राज्य कारभार चालवताना कर्तव्यात कोणतीही कसर सोडणार नाही, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले आहे. असे असताना विरोधकांची नकारघंटा सुरूच आहे. सरकारकडून अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला आयोजित चहापानावर बहिष्कार टाकण्याची परंपरा यंदाही विरोधी पक्षाने पाळली. वास्तविक, विधीमंडळात विविध विषयांवर सांगोपांग चर्चा होत असते. तिथे कायदे तयार होतात. त्या अनुषंगाने होणाऱ्या चहापान कार्यक्रमात सहभागी होऊन विरोधकांनी आपली मते, सूचना व्यक्त करणे अपेक्षित असताना बहिष्कार टाकून काय साध्य होणार? आधीच विरोधकांमध्ये अनेक विषयांवरून विसंगती दिसून येते. विधानसभेतील विरोधी पक्षनेतेपदावरूनही रस्सीखेच सुरु आहे. त्यामुळे सरकारची कोंडी करण्याआधी त्यांनी आपापसात समन्वय राखणे सुज्ञपणाचे आणि सर्वांसाठी उचित ठरेल.**

# कर्जतच्या बटाटेवड्यांची चौथी पिढीही राखतेय चव!



**खबरबात**
**विजय मांडे**

पूर्वी मुंबईहून पुण्याकडे जाणारे रेल्वे प्रवासी कर्जत रेल्वे स्थानकावर मेल, एक्सप्रेसला खंडाळा घाटातून जाण्यासाठी गाडी चार-पाच मिनिटे थांबत असे त्यावेळी दिवाडकरांचे बटाटेवडे खाल्ल्याशिवाय पुढे जात नसत. विशेष म्हणजे संध्याकाळी डेक्कन क्वीनच्या प्रवाशांसाठी दिवाडकरांचे खास वडे असायचे परंतु आता तसे राहिले नाही. रेल्वे स्थानकावर दिवाडकरांच्या वड्याबरोबरच अन्य व्यावसायिकांचे बटाटेवडे सुद्धा उपलब्ध असल्याने 'त्या' बटाटेवड्यांची चव आता राहिली नाही. कर्जतच्या बाजारपेठेत अनेकांचे बटाटेवडे प्रसिद्ध झाले आहेत. मात्र रेल्वे स्थानकासमोरील शिंदे उपहारगृहातील बटाटेवड्यांची चव चार पिढ्यांपासून तशीच आहे आणि दगडे यांचे वडेही खूप प्रसिद्ध आहेत. त्यांची तिसरी पिढी हाच व्यवसाय करीत आहे. गेल्या महिन्यात दर वाढले मात्र लोकप्रियता कमी झाली नाही.

कर्जतमध्ये वीज नव्हती त्यावेळी बाबुराव शिंदे सायंकाळी काळोख पडू लागला की, चौका चौकामध्ये खांबावर असलेले कंदील लावत असत व सकाळी लवकर विझवत असत. नंतर त्यांनी कर्जत रेल्वे स्थानकासमोरच हॉटेल व्यवसाय करण्याचा निर्णय घेतला. वडा-पाव, शिरा, भजी, चहाने सुरुवात केली व कर्जत मधील पहिले हॉटेल व्यवसायिक ते ठरले. 'शिंदे उपहार गृह' असे साजेसे नाव त्यांनी आपल्या हॉटेलला दिले. त्यानंतर त्यांचे पुत्र विश्वासराव हे त्यांना व्यवसायात मदत करू लागले. बाबुरावांच्या नंतर त्यांनी हा व्यवसाय समर्थपणे सांभाळला. त्यांचा मुलगा संदीप त्यांच्या बरोबरीने हॉटेल मध्ये काम करू लागला. दोघे मिळून हा भरलेला व्यवसाय सांभाळू लागले.

विश्वासरावांनंतर ही जबाबदारी संदीपवर येऊन पडली. संदीपही ती अगदी चांगल्याप्रकारे सांभाळत आहे. आता त्याला त्याची दोन मुले सागर आणि समर मदत करीत असतात. पूर्वी पेक्षा कितीतरी पटीने त्यांचा व्यवसाय मोठा झाला आहे. त्याला एकमेव कारण म्हणजे चौथ्या पिढीनेही राखलेली बटाट्याची चव. येथे मिळणारी मिसळ, गोड शिरा व पुरी भाजीची चव औरच असते. शिंदें बरोबरच दगडे वडे, मावकरांचे वडे, सटूचे वडे, खोतांचे वडे, हडपचा वडा प्रसिद्ध झाला आहे. तालुक्यातील मुख्य ठिकाणी सुद्धा तेथील व्यवसायिकांनी आपाआपले बटाटे वडे प्रसिद्ध केले आहेत.

वसंतराव दगडे हे कर्जतचे सरपंच होते. त्यांनीही खूप व्यवसाय केले. अगदी छत्रीवर नाव टाकण्याचा साधा व्यवसाय सुद्धा त्यांनी केला. मात्र त्यांनी सुरू केलेला बटाटा वडा आजही त्याच चवीचा आहे. त्यांचा व्यवसाय शरद व चारुदत्त या दोघांनी सुरू ठेवला. शरदचे अकाली निधन झाल्यानंतर त्यांचा व्यवसाय त्यांचा सुपुत्र आनंद अगदी व्यवस्थित सांभाळत आहे. तसेच चारुदत्तचे मध्यंतरी निधन झाले. त्यांचा अगदी नावाजलेला व्यवसाय ओंकार सांभाळत असून त्याचा कर्जतमध्येच नव्हे तर पुण्यामध्ये सुद्धा आपला वडा पाव प्रसिद्ध करण्याचा विचार आहे. दगडे वड्याचे विशेष म्हणजे ते वडे तळण्यासाठी 'गिन्नी' तेलाचा वापर करतात त्यामुळे त्यांचे वडे ग्राहक अगदी बिनधास्तपणे खातात. या वड्याचे विशेष म्हणजे वड्या मधील मसाला गेली चाळीस वर्षे ओंकारच्या मातोश्री उज्वला करीत आहेत. त्यामुळेच त्याची चव तसूभरही कमी झाली नाही. उज्वला वाहिनीं च्या अनुपस्थितीत ओंकारची पत्नी सौ. वृषाली मसाला करते. तिच्या हातालाही तशीच चव आहे.

मावकरांचे वडे सुद्धा प्रसिद्ध आहेत. त्यांची मिसळ तर लाजबाब असते. त्यांचीही तिसरी पिढी या व्यवसायात आहे. देवेंद्र खोत यांची दुसरी पिढी हा व्यवसाय करीत आहे. संतोष दाभणे तथा सटू यानेही आपल्या टोपण नावाचा 'सटू वडा' फेमस केला आहे. कडवच्या गुरव बंधूंचा वडा सुद्धा खूप चविष्ट आहे. दोन - तीन वर्षांपूर्वी कर्जत - कल्याण रस्त्यावर वांजळे गावा नजीक हडप वडा प्रसिद्ध झाला आहे. ते सुद्धा 'गिन्नी' तेलाचा वडा तळण्यासाठी वापर करतात. अल्पावधीतच हा वडा प्रसिद्ध झाला. चार फाट्यावरील जीवन बडेकर यांचा वडा सुद्धा तितकाच चविष्ठ आहे तर भिसेगाव येथील मोहनच्या वड्याने सुद्धा नावलौकिक मिळविला आहे. तेथे प्रसिद्ध अभिनेते महेश मांजरेकर वडा खाण्यासाठी आवर्जून येतात. माथेरान मध्ये सुद्धा अरविंद शेलार यांच्या कडे मस्त वडा मिळतो. पर्यटक आवर्जून तेथे जाऊन वडा पाव खातात. कर्जत ही खवय्यांची नगरी आहे. त्यामुळे अगदी नाक्या नाक्यावर वडा पावची दुकाने आहेत. आता दर वाढले. वडा पाव पंधरा रुपयावरून विस रुपये झाला तरी लोकप्रियता कमी झाली नाही. हेच कर्जतच्या वड्याचे विशेष आहे.

# जागतिक वन्यजीव दिन

पृथ्वीवर असलेल्या प्रत्येक जीवाला जगण्याचा अधिकार आहे, मात्र काही विकृतांकडून पृथ्वीवरील दुर्मीळ वृक्ष, दुर्मीळ प्राणी, झाडांच्या प्रजातींची तस्करी करण्यात येते. याला आळा घालण्यासाठी जागतिक पातळीवर प्रयत्न करण्यात आले. संयुक्त राष्टाच्या महासभेने २०१३ ला यासाठी विश्व वन्यजीव दिवस ३ मार्चला घोषित केला. त्यानुसार ३ मार्चला दरवर्षी जागतिक वन्यजीव दिन साजरा करण्यात येतो. पृथ्वीवरील प्रत्येक वन्यजीवाला मानवासारखाच राहण्याचा आणि जगण्याचा अधिकार असल्याचे या दिवसातून पटवून देण्यात येते.

जागतिक पातळीवरील नागरिकांचे जीवन जल आणि जंगलावर अवलंबून आहे, मात्र तरीही अनेक जंगली प्राण्यांच्या आणि वन संपती तस्करी करण्याच्या घटना घडत होत्या. त्याला आळा घालण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघाने ३ मार्च १९७३ ला वन्यजीव आणि वनस्पतीच्या व्यापाराला रोखण्यासाठी करारावर सही केली होती. त्यानंतर थायलंडमधील बँकॉक येथे संयुक्त राष्ट्र संघाचे अधिवेशन २० डिसेंबर २०१३ ला आयोजित करण्यात आले होते. या अधिवेशनात वन्यजीवांच्या तस्करीला रोखण्यासाठी आणि त्याबाबत जनजागृती करण्यासाठी ३ मार्च हा जागतिक वन्यजीव दिन म्हणून साजरा करण्याचे ठरवण्यात आले. तेव्हापासून ३ मार्च हा जागतिक वन्यजीव दिन म्हणून साजरा करण्यात येतो.

युनायटेड नेशन्स जनरल असेंब्लीने २० डिसेंबर २०१३ रोजी आपल्या ६८व्या अधिवेशनात, जगातील वन्यप्राणी आणि वनस्पतींबद्दल जागरुकता निर्माण करण्यासाठी ३ मार्च हा दिवस जागतिक वन्यजीव दिन म्हणून घोषित केला. या मागची पार्श्वभूमी म्हणजे ३ मार्च हा १९७३ हा दिवस प्रजातींच्या वन्यजीव आणि वनस्पतींच्या आंतरराष्ट्रीय व्यापारावरील करारावर स्वाक्षरी करण्याचा दिवसदेखील आहे.

जागतिक वन्यजीव दिन २०२४ची थीम, कनेक्टिंग पीपल अँड प्लॅनेट ही होती एक्सप्लोरिंग डिजीटल इनोव्हेशन इन वाइल्डलाइफ कॉन्झर्वेशन, संरक्षण प्रयत्नांना पुढे नेण्यासाठी तंत्रज्ञानाच्या संभाव्यतेवर प्रकाश टाकते. ही थीम आजच्या डिजिटल युगात विशेषत: संबंधित आहे, जिथे तांत्रिक प्रगती दीर्घकालीन संवर्धन आव्हानांसाठी नवीन उपाय देऊ शकते. डिजिटल टूल्स आणि प्लॅटफॉर्ममध्ये देखरेख आणि संरक्षण प्रयत्न वाढवण्याची, शाश्वत वन्यजीव व्यापार पद्धतींना समर्थन आणि सकारात्मक मानव-वन्यजीव संबंध वाढवण्याची शक्ती आहे.



## बदलते तंत्रज्ञान

# गुगल मॅपवर तुमचे लाईव्ह लोकेशन पाठवा कुटुंबियांना




महिलाच्या सुरक्षेबाबत कायमच चिंता व्यक्त केली जाते पण म्हणून मुलींनी घराबाहेर पडू नये हा काही पर्याय नाही. उलट मुलींना, महिलांना कोणत्याही संकटाच्या परिस्थितीचा सामना करण्यासाठी तयार केले पाहिजे. प्रत्येक महिलेने आणि मुलीने आपल्या सुरक्षेची काळजी घेतली पाहिजे. घराबाहेर पडताना आपण कुठे जात आहोत आणि कधी परत येणार आहोत याबाबत घरच्यांना नेहमी सांगितले पाहिजे. तसेच बाहेरगावी प्रवास करताना, घरी पोहचयाला उशीर झाला तर मोबाईलवरून तुमचे लाईव्ह लोकेशन तुमच्या कुटुंबियांना पाठवले पाहिजे. व्हॉटस्‌ॲपवर ही सुविधा फार पुर्वीपासून आहे पण लाइव्ह लोकेशन पाठवण्याची सुविधा गुगल मॅप्सवर देखील आहे. विशेष म्हणजे गुगल मॅप्सवर लाईव्ह लेकेशन शेअर केल्यानंतर तुम्ही घरापासून किती दूर अंतरावर आहात, तुमच्या फोनची बॅटरी किती टक्के बाकी आहे, सध्या जिथे आहे तेथून घरी यायला किती वेळ लागेल हे देखील समजू शकते. तसेच तुम्ही नोटिफिकेशनमध्ये गुगल मॅप्सवर तुमच्या घराचा आणि ऑफिसचा पत्ता त्यात जोडू शकता जेणेकरून तुम्ही घरून ऑफिसला पोहचला की तुमच्या कुटुंबाच्या मोबाईलवर तुम्ही ऑफिसला पोहचला हे नोटिफिकेशन जाते.

**गुगल मॅप्सवरून लाईव्ह लोकेशन कसे पाठवावे?**

- प्रथम गुगल मॅप्स मोबाईलवर उघडा
- गुगल मॅप्सवरून लाईव्ह लोकेशन शेअर करण्यासाठी तुमच्या प्रोफाईल आयकॉनवर जा
- तिथे लोकेशन शेअरिंग करू शकता.
- त्यानंतर लोकेशन शेअर करताना तुम्हाला दोन पर्याय दिसतात पहिला असतो एक तासासाठीदुसरे पर्याय असतो जोपर्यंत तुम्ही हा पर्याय बंद करत नाही तोपर्यंत यापैकी एक पर्याय निवडू शकता. आणि तुमच्या कॉन्टॅक लिस्टमध्ये जाऊन तुमच्या कुटुंबातील व्यक्तींना ते पाठवू शकता.
- तुमच्या मोबाईलच्या नोटिफिकेशन ऑन करा.
- तुम्हाला घरी जायला उशीर झाला किंवा बाहेरगावी प्रवास करत असाल तर अशावेळी ही सुविधा नक्कीच उपयोगी ठरू शकते. या शिवाय प्रत्येक महिलेला सुरक्षा हेल्पलाईन नंबर माहीत असला पाहिजे, जेणेकरून कोणत्याही संकटात सापडल्यास तातडीने पोलिसांची मदत घेऊ शकता.

# उद्योगपती जमशेदजी टाटा



**निमित्त**

जमशेदजी नुसेरवानजी टाटा हे टाटा समूहाचे संस्थापक होते ज्यांनी १८७०च्या दशकात मध्य भारतात एका कापड गिरणीने सुरुवात केली होती. ज्यांच्या दूरदृष्टी आणि महत्त्वाकांक्षी प्रयत्नांमुळे भारत औद्योगिक देशांच्या गटात सामील झाला. ते एक देशभक्त आणि मानवतावादी होते ज्यांच्या विचारांनी आणि दृष्टींनी एक अपवादात्मक व्यावसायिक समूह घडवला. त्यांच्या मानवतेच्या गुणाने त्यांना अद्वितीय बनवले आणि आधुनिक भारतातील महान सुपुत्रांच्या समारंभात स्थान दिले. .

जमशेदजी टाटांचा जन्म ३ मार्च १८३९ रोजी गुजरातमधील नवसारी येथे एका पारशी कुटुंबात झाला. त्यांचे वडील नुसेरवानजी टाटा आणि आई जीवनबाई टाटा. ते १४ वर्षांचे असताना त्यांच्या वडिलांसोबत मुंबईत आले. त्यांनी एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला आणि १८५८ मध्ये 'ग्रीन स्कॉलर' म्हणून उत्तीर्ण झाले, जे आजच्या पदवीधरांच्या समतुल्य आहे. विद्यार्थी असतानाच जमशेदजी टाटांनी हिराबाई दाबूशी लग्न केले. पदवी पूर्ण केल्यानंतर, वडिलांच्या निर्यात-व्यापार फर्ममध्ये सामील झाले

१८६८मध्ये वयाच्या २९ व्या वर्षी, वडिलांसोबत सुमारे नऊ वर्षांचा कामाचा अनुभव घेतल्यानंतर, त्यांनी २१,००० रुपयांच्या भांडवलासह एक ट्रेडिंग कंपनी सुरू केली आणि नंतर ती टाटा ग्रुपमध्ये विकसित झाली.१८६९ मध्ये, त्यांनी चिंचपोकळी येथील एक दिवाळखोर तेल गिरणी घेतलीआणि तिचे कापड गिरणीत रूपांतर केले आणि त्याचे नाव अलेक्झांड्रा मिल ठेवले. दोन वर्षांनंतर, त्यांनी ती गिरणी नफ्यासाठी विकली.

१८७४मध्ये त्यांनी १.५ लाख रुपयांच्या बीज भांडवलासह सेंट्रल इंडिया स्पिनिंग, विव्हिंग अँड मॅन्युफॅक्चरिंग कंपनी नावाचा एक नवीन उद्योग सुरू केला. तीन वर्षांनंतर, त्यांचा उपक्रम त्याचे नशीब साकार करण्यासाठी सज्ज झाला. नागपूरमध्ये एम्प्रेस मिल्स अस्तित्वात आली. जमशेदजींनी वयाच्या ३७ व्या वर्षी त्यांच्या पहिल्या विलक्षण प्रवासाला सुरुवात केली.

एक लोखंड आणि पोलाद कंपनी स्थापन करणे, भारतीयांना विज्ञानाचे शिक्षण देणारी जागतिक दर्जाची शिक्षण संस्था आणि एक जलविद्युत प्रकल्प उभारणे.हे त्यांचे स्वप्न होते.त्यांच्या हयातीत ते प्रत्यक्षात आले नाही, पण त्यांनीच त्याची बीजे रोवली. त्यांनी मुंबई-क्षेत्रातील जलविद्युत प्रकल्पाची योजना आखली जी १९०६ मध्ये टाटा पॉवर कंपनी बनली.जमशेदजी टाटा यांचे पुत्र सर दोराबजी आणि सर रतनजी यांच्या मार्गदर्शनाखाली टाटा आयर्न अँड स्टील कंपनी भारतातील सर्वात मोठी खाजगी मालकीची पोलाद उत्पादक कंपनी बनली.

कंपन्यांच्या गटाचे केंद्रक केवळ कापड, पोलाद आणि जलविद्युत उत्पादनच करत नाही तर रसायने, कृषी उपकरणे, ट्रक, लोकोमोटिव्ह आणि सिमेंट देखील तयार करते. त्यांच्या इतर व्यावसायिक उपक्रमांमध्ये भारतातील पहिले लक्झरी हॉटेल ताजमहाल पॅलेसचा समावेश होता. १९ मे १९०४ रोजी बॅड नौहेम येथे त्यांचे निधन झाले. जगभरातील उद्योजकांसाठी प्रेरणा आणि प्रेरणेचा स्रोत आहेत.

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# रोज किती केस गळणं असतं नॉर्मल?



केस हा प्रत्येकासाठी अतिशय जिव्हाळ्याचा विषय असतो, कारण केस व्यक्तीचे सौंदर्य वाढवितात. प्रत्येकाला जाड, चमकदार केस आवडतात, बरोबर? पण, आजकाल केस गळणे आणि पातळ होणे अगदी सामान्य झाले आहे. अनेकांना केसगळतीचा सामना करावा लागतो. ताणतणाव, जीवनशैली, प्रदूषण व योग्य पोषक घटकांचा अभाव यांमुळे केसगळतीची समस्या उद्भवते. केसांची निगा राखण्यासाठी आपण शॅम्पूपासून ते तेलांपर्यंत अनेकविध साधनांचा वापर करतो. केस गळणे हे एक नैसर्गिक चक्र मानले जाते. तज्ज्ञांनुसार सामान्य केसगळती असेल, तर काळजी करण्यासारखे काहीही नसते.

केस धुताना केस गळणे पूर्णपणे सामान्य बाब आहे. त्यावेळी सरासरी दररोज ५० ते १०० केस गळणे सामान्य आहे आणि शॅम्पू करताना थोडे अधिक.

मात्र, काही वेळा केसगळतीकडे गांभीर्याने बघण्याची गरज असते. केसांचे झुपके, अचानक वाढलेले केस गळणे किंवा केस पातळ होणे असे काही दिसल्यास ते तणाव, हार्मोनल असंतुलन किंवा पौष्टिकतेच्या कमतरतेमुळे होऊ शकते. अशा परिस्थितीत मूळ कारण शोधणे महत्त्वाचे आहे.

डॉ. चौस यांनी केसांची काळजी घेण्याच्या दृष्टीने सुचवलेल्या काही महत्त्वाच्या टिप्स खालीलप्रमाणे :

**सौम्य शैम्पू निवडा :** तुमच्या केसांच्या प्रकाराला अनुकूल असा सल्फेटमुक्त

सौम्य शैम्पू निवडा. कठोर रसायने कालांतराने केस कमकुवत करू शकतात.

**केस धुण्याआधी विंचरा :** केस तुटणे टाळण्यासाठी आणि गुंता होऊ नये म्हणून, तसेच केसगळती कमी करण्यासाठी शॅम्पू करण्यापूर्वी केस हलक्या हाताने विंचरून घ्या.

**गरम पाणी टाळा :** गरम पाण्याने केस धुण्याने नैसर्गिक तेल निघून जाते आणि त्यामुळे केस कमकुवत होतात. त्याऐवजी थंड किंवा कोमट पाणी वापरा.

**टाळूला हलक्या हाताने मसाज करा :** केसाच्या मुळांशी जास्त घासणे टाळा. मुळांना ताण न देता स्वच्छ करण्यासाठी तुमच्या टाळूला हलक्या हाताने मसाज करा.

**ओव्हरवॉश करू नका :** वारंवार केस धुण्यामुळे टाळू कोरडी होऊ शकते आणि त्यामुळे केस तुटणे वाढू शकते. आठवड्यातून दोन ते तीनपेक्षा जास्त वेळा केस धुऊ नये.

# श्री सदस्यांकडून रायगड जिल्ह्यात स्वच्छता अभियान

## ◆ मंत्री भरत गोगावलेंसह, आमदार, अधिकारी, कर्मचाऱ्यांचा सहभाग





**पोलादपूर :** महाराष्ट्र भूषण डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जन्मशताब्दी निमित्त डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान, रेवदंडा यांच्यामार्फत प्रतिष्ठानचे विश्वस्त पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी, डॉ. सचिनदादा धर्माधिकारी, उमेशदादा धर्माधिकारी व राहुलदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शन आणि प्रेरणेतून रयगड जिल्ह्यातील श्रीसदस्यांनी महास्वच्छता अभियानाचे यशस्वी आयोजन केले.

याप्रसंगी रोहयो मंत्री भरत गोगावले आणि पोलादपूर नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा सोनाली गायकवाड, उपनगराध्यक्ष प्रसाद इंगवले व नगरसेविका तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी महास्वच्छता मोहिमेमध्ये सहभाग घेतला. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे कोकण विभागीय अध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार शैलेश पालकर यांच्या प्रमुख उपस्थितीत मोहिमेचा समारोप पोलादपूर तहसिल कार्यालयाच्या प्रांगणात झाला. यावेळी पोलादपूर शहरामधून २६५० किलो सुका व ११०० किलो ओल्या कचऱ्याची स्वच्छता व विल्हेवाट लावण्यात आली.

पोलादपूर शहरातील श्री समर्थ बैठक हॉल परिसर, भैरवनाथ मंदिर व विद्यामंदिर परिसर, पंचायत समिती परिसर तसेच नगरपंचायत व तहसील कार्यालय परिसर, भैरवनाथ नगर, पोलादपूर बाजारपेठ, तसेच मुंबई – गोवा रस्त्याच्या दुतर्फा सदर स्वच्छता अभियान राबवण्यात आले. या महास्वच्छता अभियानामध्ये महाराष्ट्राचे रोजगार हमी, फलोत्पादन व खारभूमी विकास मंत्री भरत गोगावले हे देखील स्वच्छता करण्यासाठी सक्रीय सहभागी झाले होते

**श्रीवर्धन :** श्रीवर्धन शहरातील प्रमुख ठिकाणे – एस.टी. स्टॅण्ड, तहसील कार्यालय परिसर, अंजुमन कार्यालय परिसर, वनविभाग कार्यालय परिसर, श्रीवर्धन पोलिस स्टेशन परिसर, उपजिल्हा रुग्णालय परिसर, श्रीवर्धन नगरपरिषद शाळा क्रमांक १, जिवनेश्वर कुंड, जिवना श्रीराम मंदिर परिसर, आणि श्रीवर्धन समुद्र किनारा या सर्व परिसरांमध्ये स्वच्छता मोहिमेचा व्यापक प्रसार करण्यात आला. या उपक्रमाच्या माध्यमातून प्रतिष्ठानने शहरातील प्रत्येक नागरिकाला स्वच्छतेचे महत्त्व पटवून देत आहेत.

ज्यामध्ये प्रतिष्ठानच्या सदस्यांनी स्वयंप्रेरणेने स्वच्छता सुरू केली. या मोहिमेतील प्रमुख सहभागी म्हणून श्रीवर्धन उपविभागीय अधिकारी महेश पाटील, श्रीवर्धन पोलिस स्टेशनचे निरीक्षक संदीप रिकामे, श्रीवर्धन आगाराचे व्यवस्थापक मेहबुब मणेर, अंजुमन हायस्कुलचे मुख्याध्यापक खान, नगरपरिषद शाळा मुख्याध्यापक गायकवाड आणि उपजिल्हा रुग्णालयाचे कर्मचारी यांचा सहभाग होता. यामुळे या अभियानाला अधिक प्रभावीपणे राबविण्यात आले

या मोहिमेत ओला कचरा ३.५० टन आणि सुका कचरा ५.०० टन गोळा करण्यात आला.



**रोहे :** रोह्यात डॉ श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्यावतीने स्वच्छता अभियान,शहरातील शासकीय कार्यालय व मुख्य रस्ते केले स्वच्छ,१०७८ श्रीसदस्यांसह १४१ सरकारी अधिकारी अभियानात सहभागी झाले होते स्वच्छता अभियानात ३५.९ टन कचरा गोळा,

रोहा नगरपालिका हद्दीतील १४ सरकारी कार्यालयाच्या आवारात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. शहरातील संपूर्ण रस्ते, बसस्थानक व रेल्वेस्टेशन येथे स्वच्छता अभियान राबविण्यात आले

यावेळी प्रामुख्याने रोहा अष्टमी नगर परिषद मुख्याधिकारी अजयकुमार एडके, नायब तहसीलदार राजेश थोरे, रोहा पोलिस स्टेशन ए.पि.आय रावडे साहेब, वनविभाग रेंजर विकास भांबरे, आगार व्यवस्थापक प्रकाश शेलार, मेडिकल ऑफिसर नागेश मेर्थ, बी एस एन एल ऑफिसर सूवर्णा कदम उपस्थित होते.



**मुरुड :** महाराष्ट्र भूषण डॉ नानासाहेब धर्माधिकारी जन्मशताब्दी निमित्ताने मुरुड नगरपरिषदेच्या माजी नगराध्यक्ष स्नेहा पाटील ,माजी नगरसेविका युगा ठाकूर यांच्या उपस्थितीत स्वछता मोहीम करण्यात आली. या स्वछता अभियानासाठी मुरुड तालुक्यातील ४५० श्रीसदस्यांनी सहभाग घेतला व ओला कचरा ६.५ टन , व सुखा कचरा ३.१ टन गोळा करून मुरुड नगरपरिषदेच्या तेलवडे येथील डम्पिंग ग्राउंड येथे टाकण्यात आला आहे.



एकाच दिवशी महाराष्ट्र श्रीसदस्यांनी घराबाहेर पडून शहरातील रस्ते अत्यंत शांतपणे, शिस्तबद्ध पद्धतीने स्वच्छ करुन मोहीम पार पाडली .सामूहिक श्रमदानातून स्वच्छतेचा विचार प्रत्यक्ष कृतीत उतरवून आपल्या सद्गुरूंना त्यांच्या वाढदिवसाची अनोखी भेट दिली.

**माणगाव :** माणगाव शहरात या स्वच्छता अभियानामध्ये १५२० श्रीसदस्यांनी सहभाग घेतला. श्रीसदस्यांनी स्वयंस्फूर्तीने आणि शिस्तबद्ध पद्धतीने रस्त्याच्या दुतर्फा वाढलेले गवत, कचरा व प्लास्टिक बाटल्या उचलून परिसर स्वच्छ केला. तसेच गटारामधील ओला कचरा सुद्धा स्वच्छ करण्यात आले. यासाठी एकूण २२ वाहनांचा वापर करुन २८ टन ओला आणि ४४ टन सुका असा एकूण ७२ टन कचरा उचलण्यात आला. माणगांव नगरपंचायतीचे नगरसेवक नितीन वाढवळ, माजी नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, माजी उपनगराध्यक्ष संदीप खरंगटे, माजी नायब तहसिलदार सुरेश वाढवळ, नगरपंचायत स्वच्छता प्रमुख अतुल जाधव व महसुल सहाय्यक दिनेश पाचाडकर तसेच इतर संघटनांतील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.



ग्रुप ग्रामपंचायत गोरेगाव हद्दीत १२१४ श्रीसदस्यांनी सहभाग घेतला. या स्वच्छता अभियानासाठी एकूण १० वाहनांचा वापर करुन १४ टन ओला आणि २४ टन सुका असा एकूण ३८ टन कचरा उचलण्यात आला. यावेळी गोरेगांव ग्रामपंचायत सरपंच जुब्बेर अब्बासी व इतर मान्यवर उपस्थित होते.

माणगाव वगोरेगांव महास्वच्छता अभियान यशस्वी करण्याकरिता एकूण २७३४ श्रीसदस्य सहभागी झाले होते. दोन्ही मिळून ४२ टन ओला कचरा व ६८ टन सुका कचरा उचलण्यात आला.

**अलिबाग :** डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा अलिबाग यांच्या सौजन्याने अलिबाग शहरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले

डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान, रेवदंडा, ता. अलिबाग, जि. रायगड. यांच्या सौजन्याने आज दिनांक ०२ मार्च रोजी संपूर्ण महाराष्ट्र, तसेच दिल्ली, गोवा, गुजरात, कर्नाटक व मध्यप्रदेश या राज्यांमध्ये यासोबतच, अमेरिका, सिंगापूर, ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंड या देशांमध्ये यशस्वीरीत्या स्वच्छता अभियान राबविण्यात आले.आजच्या अभियानात एकूण २२०७ किमी रस्ते, ३५,२९,७८८ चौ. मी. सरकारी कार्यालये, रुग्णालये व इतर परिसर व ३१ की.मी. समुद्र किनारा स्वच्छ करण्यात आला. एकूण १,१८,१६० स्वयंसेवकांनी या स्वच्छता अभियानात सहभाग घेतला. सदर अभियानातून एकूण ३,४६८ टन ओला व सुका कचरा संकलित करण्यात आला. जमा केलेला कचरा डंपिंग ग्राऊंड पर्यन्त नेण्यात आला.सदर स्वच्छता अभियानास प्रशासनाचे मोलाचे सहकार्य लाभले.





**माथेरान :** महाराष्ट्र भूषण थोर समाजसुधारक तिर्थरूप नाना साहेब धर्माधिकारी यांच्या जयंतीनिमित्त माथेरान श्री सदस्यांकडून शहरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले.यावेळी कर्जत तालुक्यातील श्री सदस्यदेखील स्वच्छता अभियानामध्ये सामील झाले होते.

ज्येष्ठ निरुपणकार,महाराष्ट्र भूषण आणि थोर समाज सुधारक नानासाहेब धर्माधिकारी यांनी श्री बैठकीच्या माध्यमातून अनेक श्री सदस्य घडविले आहेत.भारत देशातूनच नव्हे तर परदेशातून देखील श्री समर्थ बैठक माध्यमातून श्री सदस्य घडविले गेले आहेत.१ मार्च या नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जयंतीनिमित्त रवि.दि.२ मार्च रोजी माथेरान श्री सदस्यांकडून संपूर्ण माथेरान शहरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले.यावेळी

माथेरानमधील मुख्य श्रीराम चौकात सकाळी ठीक ८ वाजता सर्व श्री सदस्य जमा झाले.त्यानंतर वेगवेगळे गट तयार करून श्री सदस्यांनी शहरातील मुख्य रस्ते तसेच विविध प्रभागात जाऊन स्वच्छता केली.यावेळी शेकडोंच्या संख्येने श्री सदस्य स्वच्छता अभियानात या ठिकाणी उपस्थित झाले होते.यापूर्वी पण नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या माध्यमातून शहरात अनेक समाजोपयोगी,सेवाभावी उपक्रम राबविण्यात आलेले आहेत.या स्वच्छता अभियानातून माथेरान मधील श्री सदस्यांनी तिर्थरूप नाना स्वारींना श्रद्धांजली अर्पण केली आहे.

**रेवदंडा :** रेवदंडा येथे मोठया संख्येने श्री सदस्यांनी सकाळी सात वाजता रेवदंडा मोठे बंदर येथून स्वच्छता अभियानास सुरूवातकेली. यावेळी श्री सदस्यांनी हाती फावडे, कुदळ, कोयते, आदीच्या सहाय्याने स्वःपरिश्रम घेवुन ठिकठिकाणी श्रमदानाने स्वच्छता केली.

रेवदंडा शहर मुख्यः रस्तालगत वाढलेली झाडी, झुडपी तसेच रस्ताच्या कडेची उनाड झाडे तसेच वाढलेले गवत यांची सफाई करून मुख्यःरस्ताच्या दुर्तफा साफसफाई केली.

श्री सदस्यांने केलेल्या स्वच्छतेने मुख्यः रस्ताने सुध्दा मोकळेपणाचा श्वास घेतला. स्वच्छता व साफ सफाईने रस्ताची रूंदी वाढल्याचे चित्र होते. रेवदंडा मोठे बंदर ते थेरोंडा पानसेवाडी व चौल पर्यंतचा रस्ता स्वच्छतेने अगदीच मोकळा झाला होता. श्री सदस्यांनी श्रमदानातून केलेल्या

स्वच्छता अभियानात गोळा करण्यात आलेला कचरा, तोडलेली झाडे झुडपी यांची सुयोग्य विल्हेवाट लावण्यात आली. प्रत्येक ठिकाणी मालवाहतूक टेम्पो मध्ये कचरा व तोडलेली झाडी झुडपी भरून योग्य ठिकाणी त्यांची विल्हेवाट लावण्यात आली.

दि. ३ मार्च रोजी निरूपणकार डॉं. सचिनदादा धर्माधिकारी यांचा वाढदिवस आहे, त्यानिमित्ताने रेवदंडा येथे डॉं. नानासाहेबधर्माधिकारी प्रतिष्ठाण, रेवदंडा यांचे वतीने श्री सदस्यांच्या श्रमदानाने स्वच्छता अभियान राबविण्यात आले.



### जाहिर नोटीस

आरटीएस वि.मा.अर्ज क्र.७६/२०२४

प्रति,

१. जानु भिकु शिंगवा,
२. नारायण भिकु शिंगवा
अ.क्र. १ व २ दोघेही रा.मु. कलोते मोकाशी,
ठाकुरवाडी, ता. खालापुर, जि. रायगड
३. बामी भिकु शिंगवा (लग्नापुर्वीचे नाव)
बामी जाणु उघडा
रा.मु.वरणे, ठाकुरवाडी, पळसदरी,
ता. कर्जत, जि. रायगड,
४. नागी भिकु शिंगवा (लग्नापुर्वीचे नाव)
नागी लहु ठोंबरे
रा.मु.स्टेशन ठाकुरवाडी, पो.बिड बु.,
ता. कर्जत, जि. रायगड, ४१०२०१
यांचे कुळअखत्यारी म्हणुन श्री. काशिनाथ
आंबो शिंगवा रा.मु. कलोते मोकाशी,
ठाकुरवाडी, ता. खालापुर, जि. रायगड ४१०२०२ .... **अपिलार्थी**

**विरुध्द**

१. जगमितसिंग सबरवाल
२. दिलप्रितसिंग सबरवाल
अ.क्र. १ व २ रा. क्लायमॅक्स रिसॉर्ट,
मु. कलोते मोकाशी, ठाकुरवाडी,
ता. खालापुर, जि.रायगड ४१०२०२
३. खालील अहमद रेहमान
रा.२९ टेम स्ट्रीट, नागपाडा, मुंबई ४०००0८
४. खैरुनिसा नुर महंमद मिरान खान
५. बातुल अधिकारी मोहम्म्द इसाक
६. सुलताना अब्दुल कादर सयीद
अ.क्र.४ ते ६ सर्व रा. कच्छी मोहल्ला,
नावडेकर चाल, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६
७. नासीर मुजीब खान
८. देहु मोरु पाटील
अ.क्र.७ व ८ रा.मु.कलोते मोकाशी,
ता. खालापुर, जि.रायगड ४१०२०२ ... **सामनेवाला**

वादी यांनी मौजे– कलोते मोकाशी,, ता. खालापुर, जि. रायगड येथील फेरफार क्र.१५२४, ७४०, ७९६ आणि ८२३ चे विरूध्द दि.०९/०८/२०२४ रोजी या कार्यालयात अपील दाखल केले आहे. प्रस्तुतचे अपील दाखल करणेस अर्जदार यांना विलंब झाला असल्याने अर्जदार यांनी विलंब माफीचा स्वतंत्र अर्ज सोबत दाखल केला आहे.

सदर विलंब माफीचे मुद्यावर दोन्ही पक्षकारांना त्यांचे म्हणणे मांडणेकामी प्रथम सुनावणी दि.२४/०९/२०२४ रोजी सकाळी ११–०० वाजता सुनावणी घेण्यात आलेली आहे. त्यानंतर वेळोवेळी सुनावणी घेण्यात आलेल्या आहेत. मात्र सामनेवाले या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. सदर अपीलाची पुढील सुनावणी दिनांक. २८/०३/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता उपविभागीय अधिकारी कर्जत उपविभाग कर्जत, प्रशासकीय भवन, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड येथे निश्चित करण्यांत आली आहे.

प्रस्तुत अर्जामधील सर्व सामनेवाले यांनी तसेच वरील जमीन मिळकती संबंधित असलेल्या व्यक्तींना २१ दिवसांच्या आत उपविभागीय अधिकारी कर्जत, जि. रायगड येथे समक्ष येऊन आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यांसह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहीत केलेल्या मुदतीनंतर कोणाचीही व कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहाणार नाही यांची नोंद घ्यावी.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

| अ.क्र | जुना सव्हे नं. | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.पॉं) | आकार |
|---|---|---|---|---|
| १ | १००/११ | ४३४ | ०.३८.००<br>पो.ख ०.०५.०० | ०.३८ |
| | | **एकुण** | **०.४३.००** | |

सदरची जाहीर नोटीस आज रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिली.

**ठिकाणः कर्जत**
**दिनांक : २८/०२/२०२५**

**सही/–**
**उपविभागीय अधिकारी**
**कर्जत उपविभाग कर्जत**

# उरण नगरपरिषद

**जिल्हा - रायगड**

**निविदा सूचना**

**जा.क्र. उनप/बांवि/६९३/२०२४–२०२५**
**उरण नगरपरिषद,**
**उरण, दिनांक :– २८–२–२०२५**

उरण नगरपरिषद खाली नमूद केलेल्या कामाकरिता नोंदणीकृत अथवा अनुभवी कंत्राटदारांकडून मोहरबंद निविदा मागवित आहे. निविदा दिनांक :– ११–३–२०२५ रोजी सायं. ४.०० वाजेपर्यंतच्या मुदतीत मुख्याधिकारी, उरण नगरपरिषद यांच्या नांवे दाखल करणेच्या आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम (रुपये) | इसारा रक्कम | सुरक्षा अनामत | | कामाची मुदत | निविदा फॉर्म फी रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | २% रोखीने | ७% बिलातून | | |
| १ | उरण नगरपरिषद हद्दीतील मासळी मार्केट जवळील मैला कॉलनीतील राहणारे सफाई कर्मचारी श्रीम. कुसुम सोलंकी यांचे रुमची दुरुस्ती करणे. | रु.१,२५,८६७/– | रु. १,२५९/– | रु. २,५४७/– | रु. ८,८११/– | २५ दिवस | रु. ५००/– |
| २ | उरण नगरपरिषद हद्दीतील मासळी मार्केट जवळील मैला कॉलनीतील राहणारे सफाई कर्मचारी श्री. गणेश राठोड यांचे रुमची दुरुस्ती करणे. | रु.१,९७,१०९/– | रु.१,९७१/– | रु. ३,९४२/– | रु. १३,७९८/– | २५ दिवस | रु. ५००/– |
| ३ | उरण नगरपरिषद हद्दीतील बोरी–उरण येथील घनकचरा व्यवस्थापन शेडमधील कचरा विलगीकरण मशिनकरिता आर.सी.सी. फाऊंडेशनचे बांधकाम करणे. | रु.१,९६,८१२/– | रु.१,९६८/– | रु. ३,९३६/– | रु. १३,७७७/– | २५ दिवस | रु. ५००/– |
| ४ | उरण नगरपरिषद हद्दीतील उरण–बालई रोडवरील पांडुरंग अपार्टमेंट येथील नादुरुस्त रस्त्याला पी.सी.सी. करणे. | रु.१,९८,५८४/– | रु. १,९८७/– | रु. ३,९७०/– | रु. १३,८९४/– | २५ दिवस | रु. ५००/– |
| ५ | उरण नगरपरिषद हद्दीतील कुंभारवाडा–उरण येथील श्री. कुंदन रावया ते श्री. रमेश थळी यांच्या घरासमोरील गटारावर नविन लोखंडी चेंबरचे बांधकाम करणे | रु. ८८,८०७/– | रु. ८८८/– | रु. १,७७६/– | रु. ६,२१६/– | १५ दिवस | रु. ५००/– |
| ६ | उरण नगरपरिषद हद्दीतील कुंभारवाडा–उरण येथील श्री. विलास ठाकूर ते श्री. कुंदन रावया यांच्या घरासमोरील गटारावर नविन लोखंडी चेंबरचे बांधकाम करणे | रु. ८८,८०७/– | रु. ८८८/– | रु. १,७७६/– | रु. ६,२१६/– | १५ दिवस | रु. ५००/– |
| ७ | उरण नगरपरिषद हद्दीतील बोरी स्मशानभूमी व बोरी येथील खेळाचे मैदानाला नविन लोखंडी गेट बसविणे. | रु. ९०,५६७/– | रु. ९०६/– | रु. १,८१२/– | रु. ६,३४०/– | १५ दिवस | रु. ५००/– |
| ८ | उरण नगरपरिषद हद्दीतील बाळासाहेव ठाकरे क्रिडा संकुल इमारतीचे नगरपरिषद रुमची दुरुस्ती करणे | रु. १,३१,०५८/– | रु. १,३११/– | रु. २,६२१/– | रु. ९,१७४/– | २५ दिवस | रु. ५००/– |

सदर कामाच्या अटी/शर्ती बांधकाम विभागातून माहितीकरिता उपलब्ध असून इच्छूक ठेकेदारांनी पाणीपुरवठा विभाग प्रमुख यांचेशी संपर्क साधावा.

**सही/–**
**(श्री. समीर जाधव)**
**मुख्याधिकारी**
**उरण नगरपरिषद , उरण**

# राज्यात १२३९ हेक्टरने कांदळ वनांमध्ये वाढ -ना. गणेश नाईक

## प्रदूषणमुक्त वने आणि पर्यावरणासाठी उपाययोजना करण्याचेही निर्देश

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्रामध्ये गेल्या दोन वर्षात कांदळवन क्षेत्रात एक हजार २३९ हेक्टरने वाढ झाल्याची माहिती राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी दिली आहे. ऐरोली सेक्टर १० येथील जैव विविधता केंद्र जेट्टी ते बेलापूर येथील जेट्टी असा पाहणीदौरा वने मंत्री नामदार गणेश नाईक यांनी खाडीमार्गे केला. कांदळवन विभागाचे वरिष्ठ अधिकारी त्यांच्या समवेत उपस्थित होते.





राज्य शासनाने दिलेल्या १०० दिवस कृती कार्यक्रमांतर्गत हा पाहणी दौरा एक भाग होता. जैवविविधता केंद्राला दरवर्षी लाखो पर्यटक भेट देतात. या ठिकाणी पर्यटकांना अधिकाधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या ठिकाणी फ्लेमिंगो पक्ष्यांना पोषक असे वातावरण कायम ठेवण्याचा वन विभागाचा प्रयत्न असतो. पूर्वी काही हजारांमध्ये असलेल्या फ्लेमिंगोची संख्या आज दीड लाखाच्या घरात गेली आहे. समुद्राच्या पाण्यावर दिसणारे प्लास्टिक, तेलाचा तवंग, प्रक्रिया न करता सोडण्यात आलेले पाणी स्वच्छ करण्यासाठी उपाय योजना करण्याची सूचना नामदार नाईक यांनी वन अधिकाऱ्यांना केली. त्याचबरोबर या विषयाशी संबंधित उद्योग, पर्यावरण, बंदरे या विभागांबरोबर या अनुषंगाने चर्चा करण्याचे निर्देशदेखील दिले.

राज्यात मागील दोन वर्षांमध्ये एक हजार २३९ हेक्टरने कांदळ वनाच्या क्षेत्रात वाढ झालेली आहे. खारफुटी पुनररोपणासारखे कार्यक्रम वनविभाग राबवित आहे. कोस्ट गार्ड तर्फे खाडी किनारी अतिशय आधुनिक उपकरणांसह नियमित गस्त सुरू असते. कांदळ वनांचे नुकसान होत नाही ना याकडे बारीक लक्ष ठेवले जाते. त्यामुळे खाडीतील कांदळवणे सुरक्षित आहेत. ज्या ठिकाणी कांदळ वनांवर अतिक्रमण करण्यात आले आहे त्या ठिकाणी सुरुवातीला संबंधित घटकांना समजावून सांगण्यात येईल. त्यानंतरही अतिक्रमणे हटवली नाहीत तर मात्र कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे वनमंत्री नाईक यांनी स्पष्ट केले. प्रवासी आणि मच्छीमारांसाठी दिवाजेट्टी २४ तास वापरण्यायोग्य करण्याचे निर्देशदेखील त्यांनी दिले. ऐरोलीमध्ये जैवविविधता केंद्र येथे वनविभागाच्या वतीने खारफुटी वूड वॉकची निर्मिती केली जाणार आहे. गोराई येथे अशा प्रकारचा वूड वॉक अगोदरच तयार करण्यात आलेला आहे.

लाकडाच्या पुलावरून चालत खारफुटी पर्यटनाचा अनुभव पर्यटकांना घेता येणार आहे. प्लास्टिक मुक्त शहर, प्रदूषणमुक्त वने आणि समुद्र यासाठी जन सहभाग आणि जनजागृतीची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले. रामाराव, सावंत, पवार, गजभिये, बहादुरे हे कांदळवन विभागाचे वरिष्ठ अधिकारी त्याचबरोबर नवी मुंबई महापालिकेचे शहर अभियंता शिरीष अरदवाड आणि युडीडीपी सोमनाथ केकाण हे अधिकारी या पाहणी दौऱ्यावेळी उपस्थित होते.

## मोहोपाड्यात माझी वसुंधरा अभियानांतर्गत भिंतीवर घोषवाक्य, रंगरंगोटीतून जनजागृती




**मोहोपाडा : प्रतिनिधी**

वासांबे मोहोपाडा ग्रुप ग्राम पंचायत ही रायगड जिल्ह्यातील सर्वाधिक लोकसंख्या असणारी ग्रुप ग्रामपंचायत असून ग्रामपंचायतीचा विस्तारही मोठा आहे. माझी वसुंधरा अभियान ५.० यशस्वी करण्यासाठी वासांबे मोहोपाडा ग्रामपंचायतीच्या सरपंच उमा मुंढे, उपसरपंच भुषण पारंगे, सर्व ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत अधिकारी वैभव पाटील यांनी शर्थीचे प्रयत्न सुरू केले आहेत.

ग्रुप ग्रामपंचायत वासांबे यांनी विविध प्रकारचे उपक्रम राबविण्यास सुरुवात केली असून, त्यामुळे पर्यावरण संतुलन बरोबर सामाजिक कार्य ग्रामपंचायतीकडून होताना दिसत आहे. वासांबे ग्रामपंचायत हद्दीतील रहदारीची ठिकाणे, वळण, रस्त्यालगतच्या मंदिरांच्या भिंती आदींवर घोषवाक्य लिहून आकर्षक रंगरंगोटीतून जनजागृती केल्याचे दिसत आहे. भिंतीवरील हे घोषवाक्य नागरिकांचे लक्ष वेधत असून त्यानुसार ग्रामपंचायत हद्दीतील नागरिक पालन करताना दिसून येत आहेत.

वासांबे मोहोपाडा ग्रुप ग्रामपंचायतीकडून नवीन बांधकाम परवाना देताना पर्यावरण संतुलन तसेच गटार, पाणी याचे नियोजन, डासमुक्त परिसर, नवीन बांधकाम करताना ते पर्यावरण पुरक, झाडे लावणे व ती जोपासना करण्यासाठी आणि नियमांना बांधिल राहील, याकडे ग्राम पंचायतीने लक्ष दिले आहे. झाडांच्या बिया गोळा करण्यात येत असून सीडबॉल तयार करण्यात येत आहेत, गाव, आदिवासी वाडी वस्ती येथील शाळांमधून मुलांच्या कौशल्य गुणांची पारख करून त्यांना मदत आणि प्रोत्साहन देऊन त्यांच्या कला गुणांना वाव दिला जात असून त्यांच्याही माध्यमातून माझी वसुंधरा अभियान राबविण्यात येत आहे.

प्लास्टिक पिशव्या बंदी करण्यासाठी स्वच्छता कमिटी अथक परिश्रम घेवून प्लास्टिक बंदी करताना दिसत आहे. आपत्ती व्यवस्थापन शिबिर, लावलेल्या वृक्षांची जोपासना करून नवीन झाडांची लागवड केली आहे, ग्रामपंचायत सदस्य, कर्मचारी,ग्रामस्थ,विद्यार्थी यांनी झाडे दत्तक घेतली आहेत.

भूमी, वायू, जल, अग्नी आणि आकाश या पंच महाभूते या पंच महाभूते तत्वांचा आधारे प्रत्यक ग्राम पंचायत सदस्य आपल्या प्रभागात प्रभावी काम करण्यासाठी प्रयत्न करीत आहे. माझी वसुंधरा अभियान हे अभियान न राहता ते कायमस्वरुपी ठेऊन पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी काम केले जात असल्याचे सरपंच उमा संदिप मुंढे आणि ग्राम पंचायत अधिकारी वैभव पाटील यांनी सांगितले.

## मॉर्डन स्कूलमध्ये राष्ट्रीय विज्ञान दिन



**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या नवी मुंबईतील सानपाडा शाखेतर्फे 'राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त' वैज्ञानिक दृष्टिकोन या विषयावर व्याख्यान घेण्यात आले. व्याख्यान वाशीतील मॉर्डन स्कूल न्ड ज्युनिअर कॉलेज येथे शुक्रवारी झाले.

विज्ञान सृष्टीतील रहस्य उलगडून दाखवते. ज्याला मानव रहस्य समजत होता, त्याची उकल झाल्यावर, त्याचा मानवी जीवनात हवा तो उपयोग करून घेऊ लागला. घटनेच्या मागील कार्यकारणभाव शोधने हे विज्ञानाचे मूल्य आहे. कार्यकारणभाव पडताळून पाहता येतो, किंबहुना कार्यकारणभावाच्या पडताळणीतूनच विज्ञान समृद्ध झाले आहे. विज्ञानात सतत नवीन मांडणीची भर पडणार आहे. ही मांडणी कालसुसंगत असणारी आहे.

मानवी जीवनातील स्थित्यंतर विज्ञानाच्या माध्यमातूनच झाली आहे. फक्त याच श्रेय विज्ञानाला कमी व इतर घटकांना अधीक मिळाले आहे. समस्त मानवी प्रजातीचा आधार विज्ञान आहे, ज्या योगे विविध आपत्तीतसुध्दा पृथ्वीवर मानवी अस्तित्व टिकून आहे. विज्ञाननिष्ठ होऊया, असा संदेश विद्यार्थ्यांना देण्यात आला.

व्याख्यानात मा.अंनिस विज्ञान विवेकी यांनी मांडणी केली. तसेच महा. अंनिस. कार्यकर्ते अशोक निकम उपस्थित होते.

## 'लायन्स सरगम'तर्फे कराओके गायन स्पर्धा

**पनवेल : वार्ताहर**

लायन्स क्लब ऑफ पनवेल सरगम तर्फे लायन्स सरगम कराओके स्टार २०२५ ही कराओके गायन स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेचे हे दुसरे वर्ष असून, या स्पर्धेची प्राथमिक फेरी रविवार १६ मार्च तर अंतिम फेरी गोखले हॉल येथे होणार आहे.

या स्पर्धेसाठी वयोगट – वय १७ पर्यंत, १८ ते ४०, ४१ ते ६०, ६१ पासून पुढे आणि फक्त लायन सभासद असे असून प्रवेश फी ५०० रुपये आहे. विजेत्यांना आकर्षक ट्रॉफी आणि रोख बक्षीस देऊन गौरविण्यात येईल. अधिक माहितीसाठी संजय गोडसे (९८६९३४७३००) आणि सुरभी पेंडसे (९३२३६७४९८९) या क्रमांकावर संपर्क करावा आणि गेल्यावर्षीप्रमाणे उत्स्फूर्त प्रतिसाद द्यावा, असे आवाहन अध्यक्ष मानदा पंडित यांनी केले आहे.

## नाईक महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन

**नवी मुंबई : बातमीदार**

कोपरखैरणे येथील श्रमिक शिक्षण मंडळाचे एफ. जी .नाईक महाविद्यालयात मराठी वाङ्मय मंडळ व ग्रंथालय तसेच राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मराठी भाषा गौरव दिनानिमित्त 'जागर मायबोलीचा' या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले होते.



मराठी वाड:मय मंडळांतर्गत महाविद्यालयात जागर मायबोलीचा या कार्यक्रमाचे आयोजन मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून करण्यात आले होते. प्राचीन इतिहासात माय मराठी, संतांची परंपरा माय मराठी, शौर्याची गाथा माय मराठी, अभिजात भाषा माय मराठी या काव्यपंक्ती द्वारे जागर मायबोलीचा या कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली.

या कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख अतिथी व वक्ते एफ.जी. नाईक महाविद्यालयाचे प्राचार्य प्रताप महाडिक यांच्या हस्ते झाले. सदर प्रसंगी अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ दत्तात्रय घोडके मराठी वाड:मय मंडळ प्रमुख प्रा. सीमा शिंदे व ग्रंथालय प्रमुख जयश्री मोरे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमअधिकारी प्रा. प्रमोद साळुंखे समिती सदस्य प्रा. जयश्री दहाट, प्रा. समिधा पाटील, प्रा. मोनिका परड प्रा. प्राजक्ता सावंत, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी उपस्थित होते.

सूत्रसंचालन मराठी वाड:मय मंडळ प्रमुख प्रा. सीमा शिंदे यांनी केले केले, तर या कार्यक्रमाचे आभार राष्ट्रीय प्रा. प्रमोद साळुंखे यांनी मानले.

## उरणमध्ये आरोग्य तपासणी मोहिमेचा शुभारंभ

**उरण : बातमीदार, प्रतिनिधी**



राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम सन २०१३ पासून कार्यरत असून यामध्ये ० ते १८ वर्ष वयोगटातील बालक व विद्यार्थी यांची वैद्यकीय पथकामार्फत आरोग्य तपासणी करण्यात येते. कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याणमंत्री प्रकाश अबिटकर यांचे संकल्पनेतून राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम २.० विशेष मोहीम तालुकास्तरीय शुभारंभ सोहळा उरणमधील पीएम रा.जि.प प्राथमिक शाळा, मुळेखंड येथे तालुका आरोग्य अधिकारी डॉ.राजेंद्र इतकरे, वैद्यकीय अधीक्षक डॉ.बाबासो काळेल, नगरसेवक राजू ठाकूर, मुखाध्यापक अमृत ठाकूर यांच्या हस्ते झाला.

रायगड जिल्ह्यामध्ये विशेष मोहीम अंतर्गत ३ मार्चपासून शासकीय व निम शासकीय शाळा, अंगणवाडी मधील बालक व विद्यार्थी यांची आरोग्य तपासणी करून संदर्भ सेवा पुरविण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी उरण येथील मुळेखंड येथील सरपंच अजय म्हात्रे, आरबीएसके पथकातील वैद्यकीय अधिकारी डॉ स्वाती म्हात्रे, डॉ.प्रणाली म्हात्रे, डॉ. निशिकांत सावंत, आरोग्य सेविका संगीता शिंदे, औषध निर्माता बालाजी शेंबाळे, आरोग्य सहाय्यक संतोष परदेशी, कुष्ठरोग तंत्रज्ञ रामदास देसले, आशा गट प्रवर्तक रुपाली पाटील, आंगणवाडी सेविका व कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता आरबीएसके व डीईआयसी विभाग तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियानातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

## 'मराठी भाषेवर प्रेम केले पाहिजे'

**पनवेल : वार्ताहर**

आपली मराठी भाषा जिवंत ठेवण्यासाठी आपण भाषेवर प्रेम केले पाहिजे. आपल्या मराठी भाषेचा अभिमान बाळगला पाहिजे, असे भावपूर्ण उद्गार कार्यक्रमाच्या अध्यक्षा व ज्येष्ठ कवयित्री ॲड. मंदाकिनी पाटील यांनी काढले.

पनवेल येथील कोकण मराठी साहित्य परिषद पनवेल शाखा व के.गो.लिमये सार्वजनिक वाचनालय पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा गौरवदिनाचे औचित्य साधून वाचनालयाच्या सभागृहात आयोजित केलेल्या खुल्या कवी–संमेलनाच्या कार्यक्रमावेळी त्या बोलत होत्या.

प्रमुख पाहुणे ज्येष्ठ गझलकार ए.के.शेख म्हणाले, आपण मराठी माणसे एकमेकांशी बऱ्याच वेळा हिंदीतून बोलतो. हे चुकीचे आहे. आपण मराठीतूनच संवाद साधला पाहिजे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वाचनालयाच्या अध्यक्षा ॲड.सुनीता जोशी यांनी केले. पाहुण्यांचा परिचय को.म.सा.प. पनवेल शाखेचे अध्यक्ष रोहिदास पोटे यांनी करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. माधुरी थळकर यांनी केले. तर कवी संमेलनाचे सूत्रसंचालन कोमसापचे सदस्य विशाल पवार यांनी केले.

वाचनालयाचे कार्यकारणी सदस्य काशिनाथ जाधव यांच्या आभार प्रदर्शनाने या सुरेल कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी वाचनालयाच्या सहाय्यक ग्रंथपाल संपदा जोशी, लिपिक हर्षिता तुरकर, सेवक संजय दिवटे यांनी विशेष परिश्रम घेतले.




## इमारत पडताना रस्त्यावर कोसळला मोठा तुकडा

**नवी मुंबई : बातमीदार**

### नेरूळमध्ये घडली घटना

नेरूळ सेक्टर १२ मधील सिसिलि सोसायटीच्या पुनर्विकासाच्या इमारतीचे डेमोलिशनचे काम सुरू आहे. या इमारतीचे बांधकाम तोडताना इमारतीचा तुकडा थेट रस्त्यावर कोसळला. नागरिकांनी पळ काढल्याने सुदैवाने कोणत्याही प्रकारची जीवित हानी झाली नाही. याबाबत प्रहार जनशक्ती पक्षाने आयुक्तांकडे तक्रार केली आहे.

सदर ठिकाणी बांधकाम कामगारांच्या तसेच जनतेच्या सुरक्षेच्या अभावी सुरू असल्याची तक्रार प्रहार जनशक्ती पक्ष अध्यक्ष प्रविण खेडकर यांनी मनापा आयुक्तांकडे केली होती, परंतू त्याबाबत पर्यंत कोणतीही कारवाई केलेली नाही

शनिवारी त्याच ठिकाणी इमारतीचे डेमोलिश काम सुरू असताना मोठ्या आकाराचा स्लॅपचा ठोकळा वरतून खाली रस्त्यावर पडला त्या ठिकाणी रस्त्यावरील ये–जा करणाऱ्या नागरिकांनी पळ काढल्याने सुदैवाने कोणत्याही प्रकारची जीवित हानी झाली नाही. या ठिकाणी महानगर गॅसची पाईप लाइन गेली आहे.

असल्या कारणाने गॅस नलिकेवर स्लॅपचा ढाचा आदळला.त्यामुळे इमारतींचे बांधला तोडताना कोणती काळजी घ्यावी याबाबत पालिकेने नियमावलीबनावणे गरजेचे असून, त्याची अंमलबजावणी होते की नाही हे तपासणे गरजेचे असल्याचे यानिमित्ताने पुढे आले आहे.

**क्लिक...क्लिक...!**



**मुरुड : खोरा बंदरात पर्यटकांना बसण्यासाठी हॉल आहे. त्याच्या मागील डोंगरावर मातीत झाडे उगवल्याने पावसाळ्यात हा भाग खाली येण्याची शक्यता आहे. तातडीने झाडांची मुळे काढून संरक्षण भिंत बाधण्याची गरज आहे.** (छाया : सुधीर नाझरे)

## केबीपी कॉलेजमध्ये मराठी भाषा गौरव दिन साजरा

**नवी मुंबई : बातमीदार**

रयत शिक्षण संस्थेच्या वाशी येथील कर्मवीर भाऊराव पाटील (केबीपी) कॉलेजमध्ये, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय महाराष्ट्र राज्य, जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय ठाणे, प्रा. माणिकराव कीर्तने वाचनालय वाशी यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त लेखक एकनाथ आव्हाड, आश्विनी बाचलकर व माजी ग्रंथालय संचालक मोतिराम मेश्राम, सुभाष कुळकर्णी उपस्थित होते. महाविद्यालयाच्या प्राचार्या



डॉ. शुभदा नायक यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत केले.

मोतिराम मेश्राम यांनी कवी कुसुमाग्रजांचा जीवनपट उलगडून सांगितला. तसेच अभिजात मराठीचा प्रवास व मराठी अभिजात कशी आहे. हे उपस्थितांना पटवून सांगितले. साहित्यिक एकनाथ आव्हाड यांनी मराठी भाषेचे सामर्थ्य, महत्त्व व तिची उपयुक्तता उपस्थितांना पटवून सांगितली. दरम्यान मराठी लेखकांचे उत्कृष्ट पोस्टर्स तयार करणाऱ्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे नियोजन प्राचार्या डॉ. शुभदा नायक यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. प्रास्ताविक जिल्हा ग्रंथालय आधिकारी प्रशांत पाटील यांनी, सूत्रसंचालन डॉ. आबासाहेब सरवदे यांनी तर आभार माया कळविकट्टे यांनी मानले.

# विदर्भाने रणजी ट्रॉफी जिंकली!

## फायनल मॅच ड्रॉ



**नागपूर : प्रतिनिधी**

देशांतर्गत क्रिकेटमधील प्रतिष्ठित रणजी करंडक स्पर्धेतील विदर्भ विरुद्ध केरळ यांच्यातील नागपूरच्या विदर्भ क्रिकेट स्टेडियमवर रंगलेला अंतिम सामना अनिर्णित राहिला. या सामन्यातील पहिल्या डावात घेतलेल्या ३७ धावांच्या अल्प आघाडीच्या जोरावर विदर्भ संघाने यंदाच्या हंगामात आपल्या नावे केला आहे. एका बाजूला विदर्भ संघाने तिसऱ्यांदा रणजी ट्रॉफी स्पर्धा जिंकली. दुसरीकडे पहिल्यांदा फायनलमध्ये पोहचलेल्या सचिन बेबीच्या नेतृत्वाखालील केरळ संघावर निराश होण्याची वेळ आली.

गत रणजी करंडक हंगामात विदर्भ विरुद्ध मुंबई यांच्यात फायनल पहायला मिळाली होती. त्या वेळी विदर्भच्या पदरी निराशा आली होती, पण पुन्हा जोमाने कामगिरी करून दाखवत एकही सामना न गमावता यंदा विदर्भ संघाने रणजी ट्रॉफी जिंकली आहे.

पहिल्यांदा फायनल खेळणाऱ्या केरळ संघाने नाणेफेक जिंकून पहिल्यांदा गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. विदर्भ संघाने पहिल्या डावात दानिश मालेवार याने केलेल्या दमदार शतकाशिवाय १५३ (२८५) करुण नायरच्या १८८ चेंडूतील ८६ धावांच्या खेळीच्या जोरावर पहिल्या डावात सर्व बाद ३७९ धावा केल्या होत्या.

## केरळच्या पदरी निराशा

या धावांचा पाठलाग करताना केरळचा कर्णधार सतिन बेबीने ९८ धावांची खेळी केली. त्याच्याशिवाय सरवाटेने ७९ धावांचे योगदान दिले. त्यामुळे केरळच्या संघाने आपल्या पहिल्या डावात ३४२ धावा केल्या होत्या. पहिल्या डावानंतर विदर्भ संघाला ३७ धावांची आघाडी मिळाली होती. ही आघाडी त्यांना तिसऱ्यांदा जेतेपद पटकवण्याच्या कामी आली.

पहिल्या डावात ८६ धावांची दमदार खेळी केल्यावर रनआउट झालेल्या करुण नायर याने अंतिम सामन्यातील दुसऱ्या डावात शतकी डाव साधला. त्याने २९५ चेंडूत १३५ धावांची खेळी केली. त्याच्याशिवाय पहिल्या डावात शतक साजरे करणाऱ्या दानिश मलेवारने दुसऱ्या डावात १६२ चेंडूत ७३ धावा केल्या. दोन्ही डावात दोघांच्या दमदार खेळीच्या जोरावरच विदर्भ संघाने तिसऱ्यांदा ट्रॉफी जिंकण्याचा डाव साधला. दुसरीकडे ही जोडी केरळ संघाच्या पहिल्यांदा जेतेपद मिळवण्याच्या वाटेत आडवी आली.

विदर्भाने दुसऱ्या डावात ३७५ धावा केल्या. दोन्ही कर्णधारांच्या संमतीनंतर सामना अनिर्णित घोषित करण्यात आला आणि विदर्भच्या खेळाडूंनी जल्लोष केला.

# दिल्लीची प्लेऑफमध्ये धडक

## डब्ल्यूपीएलमध्ये आरसीबीचा सलग चौथा पराभव

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

शफाली वर्माच्या वादळी अर्धशतकाच्या जोरावर दिल्ली कॅपिटल्स संघाने रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूवर शानदार विजय मिळवला. यासह दिल्ली यंदाच्या डब्ल्यूपीएलच्या प्लेऑफमध्ये पोहचणारा पहिला संघ ठरला, तर दुसरीकडे हा आरसीबीचा सलग चौथा पराभव आहे.

आरसीबीने प्रथम फलंदाजी करत दिल्लीला विजयसाठी १४८ धावांचे लक्ष्य दिले होते. या लक्ष्याचा पाठलाग करताना दिल्लीने शफाली आणि जोनासन यांनी शतकी भागीदारी करत अवघ्या १५.३ षटकांत नऊ गडी राखून संघाला शानदार विजय मिळवून दिला. आरसीबीकडून या सामन्यात फक्त रेणुका सिंग ठाकूर एक विकेट घेऊ शकली.

दिल्लीची मेग लॅनिंग २ धावा करत स्वस्तात बाद झाली, पण शफालीने संघाचा डाव उचलून धरला आणि जोनासनने तिला चांगली साथ दिली. शफालीने ४३ चेंडूत चार षटकार आणि आठ चौकारांसह ८० धावांची उत्कृष्ट खेळी केली, तर जोनासनने ३८ चेंडूत एक षटकार आणि नऊ चौकारासह ६१ धावा केल्या.

तत्पूर्वी आरसीबीच्या संघाने एलिस पेरीच्या ६० धावांच्या खेळीच्या जोरावर २० षटकांत ५ बाद १४७ धावा केल्या. दिल्लीने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. स्मृती मानधना पुन्हा एकदा या सामन्यात फेल ठरली आणि ८ धावा करून बाद झाली. यानंतर डॅनियल वेट २१ धावा करत बाद झाली, तर एलिस पेरी आणि राघवी बिश्त यांनी चांगली भागीदारी रचत संघाचा डाव सावरला.

पेरीने ४७ चेंडूत तीन षटकार आणि तीन चौकारांसह ६० धावा केल्या, तर बिश्तने ३२ चेंडूत दोन षटकारांसह ३३ धावांची खेळी केली. याशिवाय इतर सर्व फलंदाज फेल ठरल्या. दिल्लीकडून शिखा पांडे आणि नवी गोलंदाज चारनी यांनी प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या, तर मारिजन काप एक विकेट घेण्यात यशस्वी ठरली.

आरसीबीने सुरुवातीचे काही सामने जिंकले, पण घरच्या मैदानावर आरसीबीला एकही सामना जिंकता आलेला नाही. गोलंदाजीसह संघाची कर्णधार स्मृती मानधनाही गेल्या चार सामन्यांमध्ये चांगल्या फॉर्मात नाहीय. संघाच्या गोलंदाजीबरोबरच एकूण संघाच्या कामगिरीवरही चर्चा होत आहे.



### आरसीबीला गोलंदाजांची भासतेय कमी!

आरसीबीला यंदाच्या वूमन्स प्रीमियर लीग सीझनमध्ये गोलंदाजांची कमी भासत आहे. संघाचे तीन महत्त्वाच्या गोलंदाज श्रेयंका पाटील, आशा शोभना आणि सोफी मॉलिन्यू हे यंदाच्या मोसमातून दुखापतीमुळे बाहेर झाल्या आहेत. संघात किम गार्थ, रेणुका सिंग ठाकूर, जॉर्जिया वेयरहम आणि स्नेह राणा याच मुख्य गोलंदाज आहेत, तर एलिस पेरीलाही यावेळेस फारशी चमकदार कामगिरी करता आलेली नाही. श्रेयंका पाटील गतवर्षी संघाची स्टार गोलंदाज होती, तर सोफी मॉलिन्यू अंतिम सामन्यातील सर्वोत्कृष्ट गोलंदाज ठरली होती.

# गिलला डोळे दाखवणाऱ्या अबरारचा सूर नरमला; विराटचे केले कौतुक

**इस्लामाबाद : वृत्तसंस्था**

चॅम्पियन्स करंडक स्पर्धेत गेल्या आठवड्यात भारताने पाकिस्तानवर सहा गडी राखून विजय मिळवला. या सामन्यापासून पाकिस्तानचा फिरकीपटू अबरार अहमद चर्चेत आहे. दरम्यान, मैदानात भुवई उंचावून शुभमन गिलला डोळे दाखवणाऱ्या अबरारचा आता सूर बदलला आहे. त्याने एक पोस्ट करून मवाळ भूमिका घेतली आहे.

भारताविरुद्धच्या सामन्यात अबरारने शुभमन गिलला बाद केले होते. त्यानंतर त्याने आपली एक भुवई तिरकसपणे उंचावून गिलला पॅव्हेलियनमध्ये परतण्याचा इशारा केला. यानंतर अबरारला समाजमाध्यमांवर ट्रोल झाला. दरम्यान, आता अबरारचा सूर मवाळ झाला आहे. त्याने इन्स्टाग्रामवर भारताचा दिग्गज क्रिकेटपटू विराट कोहलीच्या फोटोसह एक पोस्ट शेअर केली आहे.



अबरारने त्याच्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, माझा लहानपणापासूनचा हिरो असलेल्या विराट कोहलीसमोर गोलंदाजी करणे आणि त्याच्याकडून माझे कौतुक होणे हे माझ्यासाठी खूपच रोमांचकारी आहे. तो एक क्रिकेटपटू म्हणून जितका मोठा आहे तितकेच त्याचे मन मोठे आहे. तो मैदानावर असो अथवा मैदानाबाहेर तो सर्वांसाठी एक मोठा प्रेरणास्त्रोत आहे.

## विक्रमासाठी खेळण्याचे कधीही डोक्यात नसते -करुण नायर

**नागपूर** : विदर्भाला तिसऱ्यांदा रणजी चषक स्पर्धेचे विजेतेपद जिंकून देण्याच्या दिशेने नेणारा नाबाद शतकवीर करुण नायर याने केरळविरुद्ध फायनलच्या चौथ्या दिवशी नाबाद १३२ धावा ठोकल्या. व्हीसीए जामठा स्टेडिमवर चौथ्या दिवसअखेर करुणने माध्यमांशी संवाद साधला.

८६० धावा ठोकल्यानंतर राष्ट्रीय संघात पुनरागमनाची आशा आहे काय, असा प्रश्न विचारताच ३३ वर्षांचा अनुभवी फलंदाज म्हणाला, चांगला खेळ करणे माझ्या हातात आहे. मला राष्ट्रीय संघात स्थान द्यायचे की नाही हे निवड समिती ठरवेल. माझ्यात असलेले कौशल्य पणाला लावून खेळत आहे. विक्रमासाठी खेळण्याचे माझ्या डोक्यात कधीही नसते. विदर्भाला तिसऱ्यांदा जेतेपद मिळवून देण्यात आपलेही योगदान राहणार असल्याचा आनंद वाटतो.

# चॅम्पियन्स ट्रॉफीत द. आफ्रिकेचा इंग्लंडवर दणदणीत विजय

**कराची : वृत्तसंस्था**

दक्षिण आफ्रिकेने आपली दमदार कामगिरी सुरू ठेवत चॅम्पियन्स ट्रॉफीच्या उपांत्य फेरीत सहज प्रवेश केला आहे. गट टप्प्यातील आपल्या शेवटच्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने इंग्लंडचा एकतर्फी सामन्यात सात गडी राखून व १२५ चेंडू राखून पराभव केला आणि अंतिम चारमध्ये आपले स्थान निश्चित केले.

सामना संपण्यापूर्वीच दक्षिण आफ्रिकेने उपांत्यपूर्व फेरीसाठी पात्रता मिळवली होती, पण या विजयासह त्यांनी ब गटात पहिले स्थान मिळवले, तर इंग्लंडचा संघ चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये एकाही सामन्यात न विजय मिळवता माघारी जाणार आहे.

कराचीच्या नॅशनल स्टेडियमवर झालेला हा सामना दुसरा उपांत्य फेरीतील संघ ठरवण्यासाठी खेळवला गेला. दक्षिण आफ्रिकेचे उपांत्य फेरी गाठणे जवळपास निश्चित झाले होते. अफगाणिस्तानला उपांत्य फेरी गाठण्यासाठी इंग्लंडला दक्षिण आफ्रिकेवर मोठा विजय आवश्यक होता, पण दक्षिण आफ्रिकेने पहिल्या डावात आपल्या गोलंदाजीच्या जोरावर ही शक्यता संपुष्टात आणली आणि उपांत्य फेरीत प्रवेश केला. त्यानंतर संघाच्या फलंदाजांनी दमदार फलंदाजी करीत सहज लक्ष्य गाठले.



इंग्लंडने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला पण हा निर्णय अगदी चुकीचा ठरला. इंग्लंड संघ आफ्रिकेच्या भेदक गोलंदाजीसमोर फार काळ टिकू शकला नाही. संघातील एकही खेळाडू ४० धावाही करण्यात अपयशी ठरला. जो रूटने सर्वाधिक ३७ धावांची खेळी केली, तर इतर सर्व फलंदाज २०-२५ धावा करत बाद झाले आणि परिणामी संघ १७९ धावांमध्ये सर्वबाद झाला. आफ्रिकेकडून मार्को यान्सन आणि वियान मुल्डर यांनी प्रत्येकी तीन, केशव महाराजने दोन, तर एनगिडी-रबाडाने प्रत्येकी एक विकेट घेतली.

इंग्लंडच्या संघाने दिलेल्या १८० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना आफ्रिकेने अवघ्या २९ षटकांत विजय मिळवला. रायन रिकल्टनने २५ चेंडूत २७ धावा केल्या. ट्रिस्टन स्टब्स मात्र खातेही न उघडता आर्चरच्या गोलंदाजीवर क्लीन बोल्ड झाला. यानंतर रॅसी व्हॅन डेर ड्युसेनने तीन षटकार आणि सहा चौकारांसह सर्वाधिक ७२ धावांची खेळी केली, तर दुखापतीतून परतलेल्या हेनरिक क्लासेनने ५६ चेंडूत ११ चौकारांसह ६४ धावांची खेळी करीत संघाचा विजय निश्चित केला. शेवटी डेव्हिड मिलरने विजयी षटकार लगावत संघाला मोठा विजय मिळवून दिला.

### इंग्लिश संघावरही पाकप्रमाणे नामुष्की

इंग्लंड संघ चॅम्पियन्स ट्रॉफीत एकही सामना जिंकू शकला नाही. पाकिस्तानचा संघही एकही सामना जिंकू शकला नव्हता. इंग्लंडचा संघ गट टप्प्यातील तिन्ही सामन्यात पराभूत झाला, तर पाकिस्तानने दोन सामने गमावले आणि एक सामना पावसामुळे रद्द झाला. बांगलादेशचा संघही चॅम्पियन्स ट्रॉफीत एकही सामना न जिंकता बाहेर पडला. इंग्लंड संघाचा कर्णधार जोस बटलर याचा द. आफ्रिकेविरुद्धचा वनडे संघाचा कर्णधार म्हणून हा अखेरचा सामना होता, पण या सामन्यात लाजिरवाण्या पद्धतीने संघ पराभूत झाला.

# विराटचे तीनशे वनडे सामने पूर्ण

**दुबई : वृत्तसंस्था**

चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत रविवारी भारत आणि न्यूझीलंड यांच्यात गट फेरीतील शेवटचा सामना खेळला गेला. या सामन्यात भारताचा स्टार फलंदाज विराट कोहली लवकर बाद झाला, पण हा त्याचा ३००वा एकदिवसीय होता.

चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये कट्टर पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानविरुद्ध शतक ठोकून विराटने त्याच्या फॉर्म आणि भविष्याबद्दलच्या शंका दूर केल्या आहेत. त्यानंतर न्यूझीलंडविरुद्धचा त्याचा एकदिवसीय कारकिर्दीतील ३००वा सामना होता. मैदानावर उतरताच विराट भारतासाठी ३०० एकदिवसीय सामने खेळणारा सातवा खेळाडू बनला.

सचिन तेंडुलकरने भारतासाठी सर्वाधिक ४६३ एकदिवसीय सामने खेळले आहेत. यानंतर महेंद्रसिंह धोनी दुसऱ्या क्रमांकावर आहे. त्याने ३५० एकदिवसीय सामने खेळले आहेत. त्याच्यानंतर राहुल द्रविड (३४४), अझहर (३३४), सौरव गांगुली (३११) आणि युवराज सिंग (३०४) यांचा क्रमांक लागतो.

दरम्यान, आपल्या वनडे कारकिर्दीतील ३००वा वनडे सामना खेळत असलेल्या विराट कोहलीला ११ धावांवर माघारी परतावे लागले आहे. मॅट हेन्रीच्या सातव्या षटकातील चौथ्या चेंडूवर विराट झेलबाद झाला आहे. ग्लेन फिलिप्सने आपल्या उत्कृष्ट क्षेत्ररक्षणाचे उदारहण दाखवत कमालीचा झेल टिपला.

# पाकची लाज गेली, पण माज कायम!

**कराची : वृत्तसंस्था**

चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेतील साखळी फेरीत भारतीय संघाने दुबईच्या मैदानात पाकिस्तानला एकतर्फी मात दिली. लाज गेली तरी माज कायम असा काहीसा सीन पाकिस्तानच्या दिग्गज क्रिकेटरच्या वक्तव्यामुळे निर्माण झाला आहे. पाकिस्तानचा माजी क्रिकेटर आणि फिरकीपटू सकलेन मुश्ताक याने भारतीय संघाला चॅलेंज दिले आहे.

सकलेन मुश्ताक याने एका कार्यक्रमात भारत-पाक यांच्यातील ताकद पहायची असेल, तर तिन्ही फॉर्मेटमध्ये प्रत्येकी १०-१० सामने खेळवायला पाहिजेत, असे मत व्यक्त केले आहे. तो म्हणाला की, जर भारतीय संघ जगातील सर्वोत्तम संघ असेल तर त्यांनी पाकिस्तानविरुद्ध १० कसोटी, १० वनडे आणि १० टी-२० सामने खेळावे. मग कळेल ते किती भारी आहेत. न्यूज २४वर चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेचे विश्लेषण करताना पाकच्या माजी क्रिकेटरने केलेले हे वक्तव्य सध्या चर्चेचा विषय ठरत आहे.

दरम्यान, यजमानपद असताना साखळी फेरीत बाद होण्याची नामुष्की पाकिस्तानवर ओढावली. पाकिस्तानी संघाने पहिले दोन सामने गमावले, तर तिसरा सामना पावसामुळे रद्द झाला. दुसरीकडे भारताने पहिले सलग दोन सामने जिंकून सेमी फायनलमध्ये प्रवेश केलेला आहे.

# नवी मुंबई महापालिका चषक ४०+ क्रिकेट स्पर्धा उत्साहात

## मंत्री गणेश नाईक यांच्याकडून शुभेच्छा अन् फटकेबाजी

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील पूर्वीचा ग्रामीण व शहरी भागातील ४० वर्षावरील खेळाडूंना क्रिकेट खेळण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. महापालिका क्रीडा व सांस्कृतिक विभागाच्या ४०+ क्रिकेट असोसिएशनच्या सहकार्याने बेलापूर सेक्टर १५ ए येथील मैदानावर चषक ४०+ क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेचे उद्घाटन वनमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते झाले. या वेळी त्यांनी प्रत्यक्ष मैदानावर फटकेबाजी केली व सर्वांना शुभेच्छा दिल्या.

या स्पर्धेत तब्बल ५७ संघांनी सहभाग घेतला. स्पर्धेच्या उद्घाटन समारंभाला महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त सुनील पवार, उपायुक्त अभिलाषा पाटील, कार्यकरी अभियंता मदन वाघचौडे, उपअभियंता पंढरीनाथ चवडे, क्रीडा अधिकारी रेवप्पा गुरव, ४०+ क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष प्रदीप पाटील व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

या वेळी मंत्री गणेश नाईक यांनी नवी मुंबईत ४०+ क्रिकेट असोसिएशनच्या माध्यमातून नेहमीच उत्तम सामाजिक कामे केली जातात, याबद्दल असोसिएशनचे कौतुक केले तसेच वयाच्या ४० वर्षांनंतर सर्वांनी आपल्या आरोग्याकडे लक्ष देऊन आनंदी आयुष्य जगता यावे यासाठी निर्व्यसनी राहून जमेल तेवढे खेळावे, चालावे



तसेच दररोज व्यायाम, योगा, प्राणायाम करावेत. विशेषतः सर्वांनी तीन-तीन महिन्याने आरोग्याची तपासणी करून त्यानुसार तत्काळ उपचार करावेत. त्यामध्ये दिरंगाई करू नये, असे आवाहन केले.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com